

मौजे गांधीनगर
सिंडीकेट अधिवेशनात
दोन मराठी साहित्यिक



अर्थातच लेखमाला

पुढील अंकी

# माणूस

३ जानेवारी १९७० । चाळीस पैसे

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष नववे : अंक एकतिसावा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी ५७३५९

किंमत ४० पैसे : वार्षिक वर्गणी वीस रुपये : परदेशची वर्गणी चाळीस रुपये

२७ डिसेंबरचा माणूस वाचला. श्री. शरद गोखले यांचे नाटचस्पर्धेचे परीक्षण वाचले. त्यात त्यांनी केलेले अखेरचे विधान चुकीचे आहे. ते म्हणतात, "महाराष्ट्रीय कलोपासक या संस्थेच्या 'कथा कुणाची' नंतर पुण्याच्या नाटचसंस्थेस अंतिम फेरीमध्ये पारितोषिक नाही." पण त्यानंतर प्रोग्रेसीव्ह ड्रॅमॅटीक असोसिएशन (P. D. A.)ने 'तू वेडा कुंभार' या नाटकास प्रथम पारितोषिक आणि ते देखील अंतिम फेरीमध्ये मिळवले आहे.

झालेली चूक दुरुस्त व्हावी यासाठी हे कळविले आहे.

डिसेंबर, २७ डॉ. वल्लभ मर्दा, पुणे

[ दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा – लेखक दादूमिया, लेखांक तीन वेळेवर हाती आला नाही. त्यामुळे तो या अंकी प्रसिद्ध होऊ शकत नाही याबद्दल दिलगीर आहोत. पुढील अंकात तो येत आहे. संपादक ]

प्रकाशित लेख: चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.



# मार्ग

श्री. ग. माजगावकर

माणूस जेव्हा जागा होतो तेव्हा गवत कापण्याची मजुरी रोजी चार आण्यावरून दोन रुपयांवर जाते.

सावकाराची मारहाण थांबते. मालकाचे न ऐकणाऱ्या एखाद्या नाठाळ मजुराला कोळशाच्या जळत्या भट्टीत ढकलून जिवंत जाळण्याचे राक्षसी अत्याचार थांबतात.

माणूस जेव्हा जागा होतो तेव्हा वारल्यांच्या मुलीबाळी, स्त्रिया ही आपलीच मालमत्ता समजण्याचे धाडस सावकार करेनासा होतो.

जेमतेम कमरेला फडके गुंडाळणारा आदिवासी शर्ट–पॅंटीत दिसू लागतो. स्त्रियाही साडीबरोबर चोळी–काचोळी वापरू लागतात.

क्वचित एखाद्या झोपडीत घड्याळ दिसते.

ठाणे जिल्ह्यातील डहाणू–तलासरी या वारली आदिवासी भागात माणसाला आलेली ही जाग तेथे जाऊनच पाहण्यासारखी आहे. 'आज आम्ही येथे काही राष्ट्रसेवेचे काम करतो. काही ठिकाणी रस्ते झालेले आहेत. वाहने–एस्. टी. येऊ–जाऊ शकतात. पण पंचवीस वर्षांपूर्वी पायी हिंडणेदेखील मुश्कील होते. त्या काळात गोदाराणी येथे आली, वारल्यांना तिने जागे केले, अन्यायाविरुद्ध बंड पुकारले. ही कामगिरी अलौकिक होती. अद्यापही तिच्या लाल बावट्याचा प्रभाव येथे जबरदस्त आहे. 'लाल महालच म्हणतात या भागाला'–एका कार्यकर्त्याचे हे विचार पहिल्या दिवशीच्या मुक्कामातच मला ऐकायला मिळाले. आचार्य भिसे, नारगोळकर पतिपत्नी या सर्वोदयी सेवकांचे परिश्रमही खूप आहेत. परंतु अन्यायाविरुद्ध झगडा देऊन माणुसकीच्या प्राथमिक हक्कांचे माप आदिवासी वारली समाजाच्या पदरात टाकणाऱ्या महत्कृत्यातील सिंहाचा वाटा लाल बावट्याकडे जातो–त्यातल्यात्यात शामराव व गोदावरी परुळेकर पतिपत्नींकडे–हे कबूल

विरोधकही नाकारू शकत नाहीत.

हा भाग पाहण्याची ओढ तशी कॉलेजमध्ये असल्यापासून होती. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांच्या अभ्यास–मंडळाच्या बैठकीत हा विषय एकदा डॉक्टरांनी निवडला होता. त्या सुमारासच 'गोदाराणी' ही कादंबरी प्रकाशित झाली होती. लेखक हडप असावेत. तिच्या आधारे डॉक्टरांनी वारल्यांची भयानक दुःस्थिती फार प्रभावीपणे आम्हा विद्यार्थ्यांसमोर उभी केली होती. गोदाराणी हे नाव प्रथम तेव्हाच कानी पडले. बैठकीनंतर नेहमी काही खाण्याचा कार्यक्रम असे. मला इतके आजही आठवते की, त्या दिवशी पुढे आलेली साबुदाण्याच्या खिचडीची बशी आम्हा सर्वांनाच त्या वारल्यांची फार क्रूर थट्टा वाटून गेली होती. बशा संपल्या पण अपराधी भावनेची टोचणी कायम राहिली. कानांनी ऐकले, कानांनी सोडून दिले. हातापायात काही संचारलेच नाही. स्मृतीचा एक बारीकसा ठिपका मात्र तळाशी कुठेतरी दडून राहिलेला होता.

पुढे सहज शक्य असतानाही या राणीला मी कधी भेटलो नाही, तिच्या राज्यात कधी डोकावलो नाही. गेल्या वर्षी मात्र ती फार आजारी आहे असे कळले. तेव्हा समाचाराला म्हणून गेलो. दरम्यान प्रकृती खूपच सुधारलेली होती. मग बोलणे वाढले, गप्पा रंगल्या, चर्चेतून मतभेदाचे व मतैक्याचे मुद्दे स्पष्ट होत गेले. वृद्ध असली तरी राणी अद्याप विकलांग नव्हती. या वयात, या अवस्थेतही शब्दाशब्दात आत्मविश्वास ठासून भरलेला होता. ध्येयवादाचा एकही पीळ सुटलेला नव्हता. स्वरातील धार जराही बोथटलेली नव्हती. मध्येच थोडा मिशनऱ्यांचा विषय निघाला होता. ठाणे जिल्ह्यात हे संकट बरेच आहे. राणी उसळून म्हणाली होती– 'आमचे हात काही केळी खायला गेलेले नाहीत. त्यांनी फार गडबड केली तर चोवीस तासात त्यांना चंबूगवाळ्यासकट फेकून देऊ.' यावेळी राणीच्या क्षीण हाताची पाच बोटे एखाद्या पात्यासारखी पदराआडून बाहेर चमकून उठली होती. तात्याराव सावरकरांची बोटे यापेक्षा अधिक नाजुक, निमुळती व गोरीपान होती. संभाषणात ती अशीच वीजेसारखी लकाकून जात. त्यांची आठवण या राणीच्या उचललेल्या पंजाने मला यावेळी करून दिलेली होती. खूप काळानंतर क्रांतीच्या दाहातून तावून सुलाखून निघालेली एक सतेज, रसरशीत मूर्ती मी पाहत होतो. शेकडो कार्यकर्त्यांना मी आजवर भेटलेलो असेन. ध्येयसिद्धी दुरावल्याने बहुतेक निराशेने कोमेजलेले दिसतात. कोणी स्पष्टपणे आपली निराशा शब्दातून व्यक्त करतो, कोणी आध्यात्मिक परिभाषेचे अवगुंठन चढवून ती लपवू पाहतो. तसे पाहिले तर राणीच्या राज्याला खिंडार पडावे, निष्ठेला तडे जावेत असे खूपच काही गेल्या पंचवीस वर्षांत जगात आणि भारतात घडलेले आहे. पण राणीची लाल निशाणावरील श्रद्धा अढळ आहे. ना. म जोशांपासून दलित सेवेचे व्रत तिने उचलले. शेकडो संस्थांतून विविध प्रकारची दलितोद्धाराची कामे केली. शेवटी कम्युनिझमशिवाय तरणोपाय नाही

या विचारावर ती येऊन ठेपली. हे वादळी वारे पिऊन, पंचवीस वर्षांपूर्वी ही वाघीण जेव्हा डहाणू–उंबरगावच्या जंगलात झेपावली तेव्हा, त्या कडेकपाऱ्यातून हिंडताना, एखाद्या पाड्यावर विसावताना, सावज दिसताच डरकाळी फोडताना, गुहेत लपून राहताना, अंगावर चालून जाताना, घायाळ झाल्यावर, चडफडताना ती कशी दिसत असेल ? बराच वेळ नंतर हे दृश्य कल्पनेने मी डोळ्यासमोर आणीत होतो.

राणीच्या जोडीदाराचे काही वर्षांपूर्वी निधन झाले–शामराव परुळेकर यांचे. उभयतांच्या आठवणींचे एक पुस्तक प्रकाशनाच्या वाटेवर आहे. त्याचे नाव जाहीरातीत वाचले तेव्हाच मी जरा चपापलो होतो. – **माणूस जेव्हा जागा होतो !** लाल घणाखाली हे टवटवीत प्राजक्तपुष्प कसे काय ?

कैनाडचा डोंगर हाकेच्या अंतरावर पहुडलेला होता. एका पाड्यावर माझी आजची वस्ती होती. उद्या जो डोंगर साद घालील, जे गाव खुणावेल तिकडे जायचे होते. नाहीच कुणी हाक मारली तर सरळ घरी परतायचे होते. आजची वस्ती तर सोयिस्कर होती. अधून मधून गप्पा, प्रश्नोत्तरे, झोप, वाचन असा संथ क्रम सुरू होता. आसपासची शेतीची कामे दुपारनंतर चालू झालेली दिसली नाहीत, म्हणून सहज चौकशी केली. 'मंडळी सगळी आज आशागडच्या सभेला गेलेली आहेत' असे कळले. डहाणूपासून पाच-सहा मैलांवरचे आशागड हे एक मध्यम आकाराचे आदिवासी गाव. जेवणाची सुटी न घेता काम लवकरच संपवून किंवा अर्धवट सोडून शेतावरील सर्व स्त्री-पुरुष मजूर आशागडला सभेसाठी धावल्याचे पाहून माझे कुतूहल जागे झाले. थोडी विचारपूस केली तर कळले की, सभा लाल बावटयाची असली तर न जाऊन येथे चालतच नाही. दमदाटी होते. मारहाण केली जाते. मजुरी बंद पडते. या छळवादाला तोंड देण्यापेक्षा सर्वसामान्य माणूस म्हणतो —सभा परवडली. मग तिकडे शेतीचे कितीही नुकसान होऊ दे.


एखादा तंटा उपस्थित होतो. लाल बावटा तेथे असला तर हिरव्यागर्द बागाच्या बागा सुकवल्या जातात, पण कामाला एकाही माणसाची हात लावण्याची हिंमत होत नाही. कोणी लावलाच तर त्याची गठडी वळली गेलीच. रात्री–अपरात्री त्याच्या झोपडीवर जमावाचा हल्ला होईल, ती कदाचित जाळूनही टाकली जाईल; हात-पाय बांधून मारपीट होईल, कोंबडी-बकरे वगैरे त्या कुटुंबाजवळ जे असेल ते हिसकले जाईल— ग्रामीण दहशतीची सर्व तंत्रे लाल बावटयाच्या नावावर उपयोगात आणली जातील.

पण सावकाराकडील जमीन कमी झाली का ? जी जमीन कुळांकडे आली ती तरी कुळे नीट कसतात का ? त्याचा सारा सरकारला किंवा सावकाराला भरतात का ? सरकारी योजनांचा फायदा कुळांना मिळतो का ?

सकाळच्या वाटचालीत मध्येच एक प्रचंड बाग लागली होती. सहज तीन-चारशे एकरांचा मळा असावा. विजेचे खांब, तारेचे कुंपण दिसले, त्यावरून आज विहिरी-पंप्स वगैरे जामानिमा भरपूर असला पाहिजे. गोठ्यात जनावरे पंधरा-वीस तरी दिसत होती. शिवाय मोटारसायकल, स्कूटर, व्यवस्थित बांधलेला पक्क्या विटांचा बंगला यावरून कुळ मोठे असावे हे सहज लक्षात येत होते. या ठिकाणापासून जवळच कम्युनिस्टांचे एक 'स्टॉर्म सेंटर' पूर्वी होते अशी माहिती नंतर मला मिळाली. या स्टॉर्म सेंटरचा प्रभाव गोरगरिबांवर दहशत बसविण्यापलीकडे काही नसावा ? मी जी बाग पाहत होतो तिच्या मालकाचे तर म्हणे पक्ष-कार्यकर्त्यांशी घनिष्ठ संबंधच आहेत. हप्ते अधून मधून पोचवले जातात, निधींना वेळोवेळी देणग्या दिल्या जातात, बंगल्यावर पक्षसदस्यांची उठण्याबसण्याची, उतरण्याची सोयही होत राहते. या व्यवहाराला तात्विक मुलामाही चढविण्यात येतो. 'आज या चोरांचे घ्यायला काय हरकत आहे ? उद्या सत्ता हाती आल्यावर यांच्याकडून सर्वकाही काढून घ्यायचेच आहे.' तत्त्व आणि व्यवहार यातील भयानक विसंगती अशातऱ्हेने सांधली जाते.

बहुतेक सावकारांकडे जमिनी पूर्वीप्रमाणेच आहेत. कुळकायद्यामुळे म्हणावा इतका फरक पडलेला नाही. सरकारी मालकीच्या जंगलजमिनीवरील अतिक्रमणांचे प्रमाण त्यामानाने बरेच मोठे आहे. पण आदिवासींच्या ताब्यात आलेल्या अशा दोन-दोन चार-चार एकर जमिनींच्या मशागतीबाबत मात्र लाल बावट्याचा प्रचार उलट सुरू असतो. मी पाहत होतो, विहीरी खणण्याबाबत सर्वसामान्य आदिवासी शेतकऱ्यात येथे उत्साह, आवश्यकता किती आहे. एका शेतीतज्ज्ञाशी आदल्याच दिवशी या विषयावर चर्चा झालेली होती. माझ्या आणि त्यांच्या विचारांना खटका याबाबत बरोबर जमत होता. दिडोशीचे आबा करमरकर. दुधात थेंबभरही पाणी न मिसळता डेअरीचा धंदा मोठ्या प्रमाणावर यशस्वी करून दाखविणारा मला भेटलेला पहिला माणूस ! एक पैचीही लाच न देता यांच्या दुधाच्या ट्रक्स लांबवर पळत असतात. पारगावसारख्या पुणे जिल्ह्यातील दुष्काळी भागात व दिंडोशीच्या भरपूर पावसाच्या जमिनीत यांचे शास्त्रोक्त शेतीचे प्रयोग नेहमी चालू असतात. मुंबईच्या गोरेगाव उपनगर विभागात समाजवादी पक्षाचे आबा जुने कार्यकर्तेही आहेत. अलीकडे आबांचा एकूणच पक्षपद्धतीवरचा विश्वास ओसरला आहे, म्हणून फारसे ते कुठे चळवळीत दिसत नाहीत. युवकक्षेत्राविषयी मात्र त्यांना आजही आस्था आहे. या क्षेत्राला काही विधायक वळण लावावे यासाठी त्यांची धडपड सुरू आहे. 'साधने'त त्यांचा एक लेख अलीकडेच प्रसिद्ध झाला होता – 'भायल्या मंगलची हाक.' मी तो वाचला होता. बोरिवली तालुक्यातील मागाठणे गावचा भायल्या हा एक आदिवासी शेतकरी. त्याच्या शेतात विहीर खणण्याचा कार्यक्रम

[ पृष्ठ ६४ वर ]



# दिल्ली

## दिनांक २३ डिसेंबर

### डावीकडचे विचारमंथन

राजधानीतले राजकारण सध्या बऱ्हंशी अहमदाबाद व मुंबई येथे निर्यात झाले असल्याने दिल्लीच्या वार्तापत्रात फार तर त्याचे पडसाद देणे एवढेच शक्य आहे. त्यातला एक लक्षात घेण्याजोगा पडसाद म्हणजे गेल्या आठवड्यात काही प्रमुख डाव्या पार्लमेंट सदस्यांनी येथे एका जाहीर चर्चेत "काँग्रेसच्या विभाजनामुळे राजनैतिक स्थैर्य येईल काय?" या प्रश्नाचा केलेला ऊहापोह. या सर्व मंडळींच्या मते काँग्रेस फुटली हे चांगले झाले, कारण या फुटीमुळे सुरू झालेल्या प्रक्रियेतून शेवटी राजकीय विचारांचे ध्रुवीकरण होऊ शकेल. आणखी एका मुद्यावर या मंडळींचे एकमत झाले, व तो म्हणजे केवळ काँग्रेसचे तुकडे झाल्याने जनतेचे प्रश्न सुटले असे होत नाही. या पुढच्या काळात कोठकोठले राजकीय पक्ष कोठल्या कार्यक्रमावर एकमत होऊन एकजूट करतील यावर देशाच्या राजकारणाचे स्थैर्य अवलंबून राहील.

चर्चेत एसेम् म्हणाले, "काँग्रेसच्या विच्छेदनामुळे जनता राजकीय चाकोरीतून बाहेर फेकली गेली आहे. देशातली आर्थिक विषमता स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही सारखी वाढतच गेली आहे, व या विषमतेतूनच सध्याची राजकीय बेबंदशाही निर्माण झाली आहे. आतापर्यंत पददलित असलेली जनता आता जागी झाली आहे, व तिच्या जागृतीमुळे निर्माण झालेल्या अस्थैर्यातूनच स्थैर्य निर्माण होणार आहे." एसेमनी अशीही ग्वाही दिली की, मालमत्तेच्या हक्काला मौलिक हक्कांच्या यादीतून काढून टाकण्यासाठी घटनेत आवश्यक तो बदल करणे सरकारला लवकरच भाग पडेल.

प्रसोपाच्या द्विवेदींनी आशा व्यक्त केली की, 'वैचारिक भेदभावामुळे काँग्रेसी, मंडळीत आणखी फूटही पडेल. परिणामतः इंदिराजींना एकतर मध्यावधी निवडणुका घ्याव्या लागतील, नाही तर संयुक्त सरकार स्थापावे लागेल. कारण सध्याचे अल्पसंख्याक सरकार फार काळ टिकणे शक्य दिसत नाही. उत्तर प्रदेशाच्या उदा-

हरणावरून हे स्पष्ट झाले आहे की, कांग्रेसच्या विभाजनामुळे उजवीकडील पक्षांचे संघटन सुलभ झाले आहे. ही संधी साधून विरोधी पक्षांनी देशातल्या राजकीय विचारसरणीत एक स्पष्ट विभाजन घडवून आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. "

द्रविड मुन्नेत्र कळहम्चे सेझियन म्हणाले, "काँग्रेस फुटली हे अर्थातच चांगले झाले, पण ही फूट तत्त्वावर आधारलेली नसून व्यक्तींवर आधारलेली आहे. सदोबा अन् कामराज, किंवा मोरारजी अन् अशोक मेहता यांच्यात कुठले विचार-साधर्म्य आहे?–इतकेच काय पण इंदिराजी अन् दिनेश सिंग यांची मते तरी कितीशी जुळणारी आहेत? तरी देखील हा संघर्ष पुढे तात्त्विक स्वरूप धारण करील अशी आशा वाटते. इंदिराजी जोपर्यंत समाजवादी कार्यक्रम अंमलात आणायची हमी देतील तोपर्यंत द्रविड मुन्नेत्र कळहम् इंदिरा-सरकारला पाठिंबा देईल."

साम्यवादी पार्लमेंट सदस्य वासुदेवन् नायर म्हणाले, "आज कुठलाही पक्ष स्वतःच्या बळावर समाजाला भांडवलशाहीच्या मगरमिठीतून सोडवू शकत नाही, म्हणूनच आम्ही इंदिरा-सरकारला पाठिंबा देत आहोत. हे सरकार आर्थिक व सामाजिक क्षेत्रात महत्त्वाचे बदल घडवून आणील अशी आम्हाला आशा वाटते." मार्क्सवादी पार्लमेंट सदस्य राममूर्ती म्हणाले, "यापुढे देशात काही काल अस्थिरता माजणार, पण लोकांनी त्याला भिऊ नये, कारण सध्या चालू असलेल्या परिवर्तनात स्वतः जनतेने भाग घेतला असल्याने भावी लोकशाहीचा पाया मजबूत होणार आहे."

हे सर्व डावे विचार–मंथन येथे इतक्या विस्ताराने देण्याचे कारण म्हणजे इंदिराजी साम्यवादी नाहीत (व 'साम्यवादी होणार नाहीत') हे अहमदाबादच्या जमलेल्या मंडळींप्रमाणे डाव्या इंदिरा– समर्थकांनाही चांगले माहीत आहे, तेव्हा व डावी फळी याचे जेव्हा जेव्हा संगनमत होईल तेव्हा तेव्हा ते एक राजकीय सौदा म्हणून केले जाईल या बाबतीत डाव्या नेत्यांच्या मनात संदेह नाही. प्रस्तुत चर्चेत प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे हाच खुंट हलवून बळकट करण्यात आला आहे.

## उजवीकडचे विचार–वारे

डावीकडे हे विचार, उजवीकडे काय? अर्थात या प्रश्नाचे उत्तर अहमदाबादला गर्जून देण्यात आले आहे. पण त्या आधीही अहमदाबादचे महारथी मोरारजी यांनी दिल्लीत एका मुलाखतीत काही प्रश्नांची उत्तरे दिली त्यातली मोक्याची प्रश्नोत्तरी अशी: १९६७ च्या निवडणुकीत जनतेने दिलेला कौल आता कांग्रेसच्या विभाजनानंतर शिल्लक राहिला आहे असे म्हणता येईल काय? उत्तर: "होय. कारण फुटीमुळे कांग्रेसच्या कार्यक्रमात काही बदल झालेला नाही. आमचे सध्याचे धोरण निवडणूक–जाहिरनाम्याला धरूनच आहे. उलट या बंडखोर मंडळींनाच हा कार्यक्रम बदलायचा आहे." तुमच्या कांग्रेसला कुठल्या पक्षाबरोबर संयुक्त आघाडी

उभारता येईल ? मध्यावधी निवडणुकीचा प्रसंग आल्यास अशा पक्षांबरोबर तुमच्या काँग्रेसने हातमिळवणी केलेली तुम्हाला चालेल काय ? उत्तर : " कार्यक्रमावर आमचे एकमत होऊ शकले तर अशी हातमिळवणी मला निश्चितच आवडेल. कारण निवडणूक लढविणाऱ्या पक्षांची संख्या जेवढी लहान असेल तेवढे लोकशाहीच्या दृष्टीने चांगले. " सध्याचे इतर पक्षांचे कार्यक्रम लक्षात घेता, अशी शक्यता कितपत आहे ? उत्तर : " इतर पक्षांचे धोरणही बदलत आहे. जनसंघ आता नवीन विचार करीत आहे. त्यांच्या नवीन आर्थिक कार्यक्रमाला त्यांनी समाजवादी म्हटले नसले तरी तो बराच प्रागतिक स्वरूपाचा आहे. स्वतंत्र नेते मसानी देखील परवा म्हणाले की, स्वतंत्र पक्षाने आता एकटे बाहेर राहून चालायचे नाही, त्याला देखील यापुढे राजकीयदृष्टचा कार्यक्षम रहायचे असेल तर असल्या कार्यक्रमाचा विचार केला पाहिजे. "

थोडक्यात मल्लीनाथी करायची म्हणजे विरोधी काँग्रेस (मोरारजींनी इंदिरा-काँग्रेसला ' सरकारी काँग्रेस ' म्हटलेच आहे), जनसंघ व स्वतंत्र यांच्यातला वैचारिक दुरावा पुनर्विचारामुळे म्हणा की परिस्थितीमुळे म्हणा, मुंगीच्या पावलाने का होईना. ' पण कमी होत चालला आहे.




## संस्थानिकांच्या अंताचा आरंभ ?

संस्थानिकांचे तनखा-प्रकरण हे समाजवादी म्हणविणाऱ्या इंदिरा-सरकारला झालेले अवघड जागेचे दुखणे आहे, व ते दुखणे आता विकोपाला जाऊन ऑपरेशनचा प्रसंग येऊन ठेपलेला दिसतो. सध्या संस्थानिक मंडळी इंदिराजी-यशवंतरावजींना भेटून विचार-विमर्श करीत आहेत. पण तनखे बंद करण्याचा पूर्वीच्या काँग्रेसचा ठराव आणि इंदिरा-पक्षीय तरुण तुर्कांचा सध्याचा नेट या दोन गोष्टी लक्षात

घेता तनखे बंद करायचे की नाही हा प्रश्न केव्हाच निकालात निघाला असून ते कोणत्या पद्धतीने बंद करायचे एवढीच चर्चा करण्याची मोकळीक इंदिराजींना राहिली आहे. शिवाय ही चर्चाही ६९ साल संपायच्या आत संपवायची हमी यशवंतरावांनी देऊन ठेवली असल्याने हे वार्तापत्र छापायच्या आत या सर्व प्रकरणाची इतिश्री झालेली असणार. काल पंचवीस संस्थानिक इंदिराजींना भेटले तेव्हा दोन्ही बाजूंनी समजूतदारपणाचे गोड प्रदर्शन केले, पण फलनिष्पत्ती अशी विशेष झाली नाही. इंदिराजींना व त्यांच्या सरकारला अजूनही म्हणे अशी आशा वाटते की, हा प्रश्न अजूनही वाटाघाटींनी सुटू शकेल; पण या आशेचे मूळ संस्थानिकांना सापडलेले दिसत नाही. ते म्हणतात, सरकारने या बाबतीत आधीच एकतर्फी निर्णय घेतलेला दिसतो, मग वाटाघाटींना वाव कोठे आहे ? मग तुम्ही या भेटी—गाठी घेता कशाला ? या प्रश्नावर त्यांचे उत्तर: हा प्रश्न मैत्रीपूर्ण वातावरणात सुटावा ही आमची सदिच्छा सिद्ध व्हावी एवढ्यासाठी. ही सदिच्छा वाया गेली तर मात्र ही मंडळी कोर्टात जाणार आहेत. 'उभयतर्फी ठरलेल्या गोष्टीत एकतर्फी निर्णय' घेण्यात आला तर हा एकच मार्ग त्यांच्यापुढे उरतो असे त्यांचे म्हणणे आहे. एकूण तनख्याचा शिमगा (की दिवाळी ?) संपला तरी कोर्टातले कवित्व बरेच दिवस चालणार असे दिसते.

## गौडबंगाल की गौडकेरळ ?

बंगाल अधिकृतरीत्या साम्यवादी झाल्यापासून गौडबंगाल या शब्दाला एक विशिष्ट अर्थ प्राप्त झाला असे म्हणायला हरकत नाही. परंतु नुकतेच लोकांच्या नजरेत भरलेले एक गौडबंगाल, बंगालमध्ये नव्हे तर केरळमध्ये घडले. 'इंदिरा–सरकार हे सोव्हिएट सरकारच्या ताटाखालचे मांजर झाले आहे' या अहमदाबादी आरोपाला सज्जड दुजोरा देण्यासाठीच जणू काय सोव्हिएट सरकार त्रिवेंद्रम्‌मध्ये गुपचुप बांधीत असलेल्या सांस्कृतिक केंद्राची इमारत कोसळली व सगळेच बेंड फुटले. या प्रकरणी परराष्ट्रमंत्रालयाचे सचिव कौल व रशियातले भूतपूर्व भारतीय राजदूत के. पी. एस्. मेनन यांनी केलेल्या भानगडींची चौकशी झाली पाहिजे, अशी उजव्या विरोधकांनी पार्लमेंटमध्ये केलेली जोरदार मागणी परराष्ट्रमंत्री दिनेशसिंगांनी धुडकावून लावली असली, तरी दहा लाख रुपयांची एवढी मोठी इमारत भारत सरकारला पत्ता न लावता कशी बांधायला घेतली गेली, अन् या अव्यापारेषु व्यापाराबद्दल आता सोव्हिएट दूतावासाचे (म्हणजेच सोव्हिएट सरकारचे) काय व कसे पारिपत्य करावे, असा दुहेरी प्रश्न सध्या इंदिरा–दिनेश आणि कंपनीसमोर उभा आहे. अजून तरी सोव्हिएट दूतावासाने प्रस्तुत प्रकरणाचा खुलासा केलेला नाही—व सरकारने मागितलेलाही नाही. तेरी भी चुप, मेरी भी चुप !

**—अनामिक**

# सरकारी उद्योगधंद्यांची इष्टानिष्टता

'आयुर्विमा आणि बँका यांचे राष्ट्रीयीकरण झाले. ही राष्ट्रीयीकरणाची बला कुठे कुठे जाणार आहे कोण जाणे ? सरकारी उद्योगधंदे म्हणजे गोंधळ. आधी सगळे तोटयात, वशिलेबाजीची कमाल, रेडटेप नुसती आ वासून बसलेली. आणि खार मात्र करदात्याच्या खिशाला. हे व अशा स्वरूपाचे उद्गार खाजगी गप्पांमध्ये पुष्कळदा ऐकू येतात. सरकारी क्षेत्रातील उद्योगधंद्यांचे महत्त्व काय, त्याचे कार्य कोणते, आजच्या आमच्या सरकारी उद्योगांमधील गुणदोष काय आहेत, राष्ट्रीयीकरणाची आवश्यकता का असते या बाबी प्रत्येक सामान्य माणसाला जिव्हाळयाच्या वाटतात. त्यांच्याबद्दल निव्वळ कॉमनसेन्सच्या थोडे पलीकडे जाऊन येथे सूत्ररूपाने माहितो सांगावयाची आहे. या विषयाची व्याप्ती फार मोठी असल्याने त्यांची ओळख अंधुक व ढोबळच होणार. पण अर्थशास्त्रीय तांत्रिक घोळामध्ये न अडकता शक्यती स्पष्टता आणण्याचे मर्यादित उद्दिष्ट डोळयासमोर धरलेले आहे.

सार्वजनिक क्षेत्रात उद्योगधंदे सुरू करण्याची वा चालू खाजगी धंद्यांचे राष्ट्रीयीकरण करण्याची जरुरी भासणे याला बरीच कारणे आहेत. संरक्षणासाठी आवश्यक वस्तूंची निर्मिती सार्वजनिक क्षेत्रात होणे श्रेयस्कर असते. एक तर सुरक्षेशी संबंधीत विषयात पूर्णपणे नियमन नसलेल्या खाजगी क्षेत्रावर अवलंबून रहाता येत नाही. दुसरी गोष्ट अवाढव्य भांडवलाची जरुरी आणि प्रचंड नफ्याबाबत अशाश्वती यामुळे कोणी खाजगी क्षेत्रात अशी निर्मिती सुरू करणेही अवघड. शिवाय आवश्यक ती गुप्तता राखणेही महत्त्वाचे असते. या दृष्टिकोनातून भारताच्या संरक्षण खात्याने असे कारखाने सरकारी क्षेत्रात चालवले आहेत.

राष्ट्राजवळील नैसर्गिक संपत्ती बव्हंशी मर्यादित असते. त्यामुळे तिचा आर्थिकदृष्टया योग्य तो वापर होण्यासाठी तिच्यावर सरकारी मालकी असणे जरूर असते. काही धंद्यांत स्पर्धा ठेवणे खर्चिक व हानिकारक असते. उदाहरणार्थ : टेलिफोन्स, पोस्ट, दळणवळणाची साधने. आणि मक्तेदारीच ठेवायची असेल तर ती सामाजिक हवी.

खाजगी क्षेत्रातील उद्योगधंदे नफ्याच्या हेतूने चालविले जातात. सहाजिकच जेथे जास्त मागणी व तज्जन्य जास्त नफा तेथेच खाजगी भांडवलाची गुंतवणूक होणार. उलट सामाजिकदृष्टया आवश्यक व उपयुक्त धंद्याची वाढ होण्याची कोणतीच खात्री नाही. म्हणूनच कमी जरुरी असलेल्या सौंदर्यप्रसाधने, मोटारी एअर कंडीशनर्स, रेफ्रिजरेटर्स अशा गोष्टींचे उत्पादन आपल्याकडे खूप होते, तर

## राजेंद्र व्होरा । अनिल गोरे

मालवहातुकीच्या व प्रवासी गाड्या, स्वस्त घरे, शेतीची अवजारे व खते यांचे कमी. मुळात आपला भांडवलसंचय आपली इच्छा असलेल्या विकासाच्या वेगाला फारच अपुरा पडणारा. त्यात खाजगी क्षेत्रातील नफ्यावर डोळा ठेवून केलेली भांडवलाची उधळण न परवडणारी असते.

बहुधा स्पर्धेमध्ये काही भांडवलदारांच्याच हातात जास्तीत जास्त उद्योगधंदे जाऊ लागतात व आर्थिक मक्तेदारी सुरू होते. (प्रा. हजारीकृत मक्तेदारी चौकशी मंडळाच्या अहवालात आपल्याकडील ही वस्तुस्थिती स्पष्ट झाली आहे.) अर्थ-व्यवस्थेवरील मूठभर भांडवलदारांच्या वर्चस्वाला आळा घालण्यासाठी मक्तेदारी धंद्यांचे राष्ट्रीयीकरण कित्येकदा लाभदायक होते.

वेगाने कारखाने वाढण्याकरता प्रथम अनुकूल परिस्थिती निर्माण करावी लागते. यंत्रसामुग्री, वीज यांचा पुरवठा हवा, दळणवळणाची साधने हवीत, पैसा हवा. पैशासाठी म्हणजेच इष्ट उद्योगांकडे पैसा जावा यासाठी बँकांचे कठोरपणे नियमन करावे लागते. यंत्रसामुग्रीसाठी परदेशावलंबन महागडे व अनिष्ट असते. म्हणून त्यांचेही कारखाने काढावे लागतात. पोलाद, वीज, रसायने असे अर्थव्यव-स्थेचे पायाभूत असणारे उद्योग सुरू करावे लागतात. भारतात त्याची जबाबदारी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून सरकारने उचलली आहे. हे उद्योगधंदे खाजगी क्षेत्रात सुरू होणे कठीण असते, कारण त्यांना लागणारे अवाढव्य भांडवल व त्याची फार काळ लांबणारी गर्भावस्था. कारखान्याची उभारणी सुरू केल्यापासून उत्पादन सुरू होऊन वस्तू बाजारात येईपर्यंतच्या कालाला गर्भावस्था म्हणता येईल. उदा० कोयना धरणामुळे वीज मिळून अधिक उत्पादन होऊन बाजारातील माल-पुरवठा वाढण्याला १०–१२ वर्षे लागली. (मध्यंतरीच्या काळात त्यावर खर्च केलेले कोट्यवधी रुपये आपल्या खिशात खुळखुळू लागले. त्यामुळे बाजारातील पुरवठा वाढण्याआधीच मागणी वाढून किमती वर गेल्या. अवजड उद्योगनिर्मितीचा हा एक अपरिहार्य परिणाम होय. सारांश सरकारी क्षेत्रातील हे उद्योग आर्थिक विकासासाठी अत्यावश्यक आहेत.

हे कारखाने वा धंदे बरेचदा तोट्यात चालतात हा आरोप त्यांच्यावर नेहमी होत असतो. परंतु त्यांच्या उभारणीमुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेला झालेला अप्रत्यक्ष फायदा लक्षात घेतला जात नाही. दुसरी गोष्ट म्हणजे कोणत्याही मोठ्या कार-खान्याला कार्यक्षमता येण्यासाठी काही काल जावा लागतो. त्यातील तंत्रज्ञ,

व्यवस्थापक हे मुरावे लागतात, व एकंदरीत स्थैर्य प्राप्त व्हावे लागते. आपले सार्वजनिक उद्योगधंदे त्या मानाने अल्पायुषी आहेत हे ध्यानात घेतले पाहिजे. खाजगी कारखान्यांच्या फायद्याकडे दिमाखाने बोट दाखवण्यात आणखी एक चूक आहे. नफा हे कारखान्याच्या कार्यक्षमतेचे सार्वत्रिक गमक नाही. खरे तर आपली व्यापारव्यवस्था उत्पादकाला झुकते माप घालणारी (saler's paradise) आहे. वाढती मागणी व अपुरा पुरवठा असताना फायदा मिळवणार नाही तो मूर्ख. दिलेल्या भांडवलावर जास्तीत जास्त उत्पादन करणे, दर्जा सुधारणे हा आपण कार्यक्षमतेचा निकष ठरविला (आणि तोच योग्य आहे) तर खाजगी धंद्यांचीही गुणवत्ता कमी दिसेल. सरकारी आणि खाजगी सर्वच भारतीय धंदे अकार्यक्षम आहेत (अपवाद वगळता) असे तज्ञांचे मत आहे. दोन्ही क्षेत्रात थोडया फार फरकाने डावी उजवी उदाहरणे दाखविता येतील, पण सर्वसाधारणपणे आपल्या उद्योगधंद्यांच्या कार्यक्षमतेत सुधारणा करण्यास पुष्कळ वाव आहे. तेव्हा विशिष्ट उद्योगधंदा सरकारी क्षेत्राऐवजी खाजगी क्षेत्रात काढल्यास त्याची कार्यक्षमता वाढेल अशी निश्चिती नाही.

बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले तेव्हा ' आता बँकेत गेल्यावर आपली कामे चटकन् होणार नाहीत, लाल फितीचे साम्राज्य सुरू होईल अशी ओरड सर्वत्र ऐकू आली. आपल्या सरकारी नोकरशाहीमधील या दुर्गुणाचा प्रादुर्भाव नाकारता येणार नाही. येथे सुधारणा झाली पाहिजे. परंतु बँकांच्या संदर्भात कर्ज देण्याचे धोरण निर्णायक महत्त्वाचे असते. त्याचे आर्थिक परिणाम दूरगामी असतात. चेक वटण्याला वेळ लागणे ही बाब दुय्यम असते.

सरकारी उद्योग म्हणजे वशिलेबाजी असे एक समीकरण आहे. परंतु वशिलेबाजी नाही कोठे ? टाटा पारश्यांना, वालचद जैनांना, किर्लोस्कर ब्राह्मणांना, बिर्ला मारवाड्यांना जवळ करू पहातात हे सर्वत्र बोलले जाते. लायक माणसाऐवजी आपल्या माणसाला नेमणे म्हणजेच अकार्यक्षमतेला प्रवेश होय. मग ते कोणी जातीसाठी करो की लाचेसाठी !

आज भारताच्या आर्थिक विकासाच्या प्रयत्नात वाढते सरकारी क्षेत्र अपरिहार्यपणे रहाणार. त्यातील दोषांकडे उघडया डोळ्यांनी पहाणे व त्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करणे जरूर आहे; पण त्यांचे महत्त्वपूर्ण स्थान नाकारून चालणार नाही.

# लाल चीनमधील मुस्लिम विभक्तवादाची समस्या

प्रा. दिनकर बोरीकर

भारतात धर्मांधता व दंगली यामुळे होणारा सामाजिक तणाव राष्ट्रीय एकात्मतेला भेडसावणारी समस्या होऊन बसली आहे. मुस्लिम समाजावर धर्माचा पगडा फार जबरदस्त आहे. त्यामुळे तुलनेने या समाजात अनुदारता, असहिष्णुता, ज्या राष्ट्रात आपण राहतो तेथील इतर जमातीतील बधुवर्गाविषयी उदासीनता; परंतु धर्माच्या नावावर आंतरराष्ट्रीय मुस्लिम बंधुत्व, अशा प्रकारचे काहीसे चित्र भारतीय मुस्लिम समाजाचे दिसून येते. एवढेच नव्हे तर राष्ट्राच्या प्रगतीसाठी काही आवश्यक कायदेकानु करायचे असतील तर या समाजाने धर्माच्या नावावर सातत्याने त्यास विरोध केला आहे. मुस्लिम समाजाला राष्ट्रीय जीवनप्रवाहात आणून राष्ट्रीय एकात्मता साधण्याचा कसा प्रयत्न करावा हा प्रश्न देशातील सेक्युलॅरिस्टांना व उदारमतवाद्यांना चिंताग्रस्त करीत आहे.

मुस्लिम समाज राष्ट्रीय जीवनप्रवाहात पडण्याचे नाकारून राष्ट्रीयत्व प्रस्थापित करू पहातो, असे केवळ भारतातच घडत आहे असे नसून, ज्या ज्या देशात सत्ता मुस्लिमेतर समाजाकडे आहे व मुस्लिम समाज अल्पसंख्याक आहे तेथे तेथे हा प्रश्न थोड्याफार फरकाने याच स्वरूपात निर्माण झाला आहे. साम्यवादी चीनला देखील या प्रश्नाला तोंड द्यावे लागले. परंतु साम्यवादी चीन भारतीय पद्धतीची लोकशाही मानीत नसल्यामुळे तो मुस्लिम समाजाच्या विभक्तवादाचा प्रश्न वेळप्रसंगी सामर्थ्याच्या बळावर सोडवित राहिला.

## मुस्लिम प्रवृत्ती

चीनमध्ये बिगर चिनी अशा पस्तीस छोट्यामोठ्या अल्पसंख्याक जमाती होत्या. चीनच्या स्वातंत्र्यसंग्रामात या जमाती आपल्याबरोबर राहाव्यात म्हणून तेथील

कम्युनिस्ट पक्षाने या जमातींना असे आश्वासन दिले होते की, देशात जनतेचे राज्य आल्यानंतर अल्पसंख्याकांना स्वयंनिर्णयाचा अधिकार दिला जाईल, व चीनमध्ये सामील व्हावयाचे किंवा नाही याचा निर्णय अल्पसंख्याक जमात घेऊ शकेल. १९४९ मध्ये कम्युनिस्ट पक्ष सत्ताधारी बनल्याबरोबर अल्पसंख्यांक जमातींची विभक्त होण्याची डोकेदुखी कायमची नष्ट करण्यासाठी हे आश्वासन बाद करण्याचे पहिले पाऊल त्यांनी उचलले, आणि राष्ट्रांतर्गत स्वायत्त प्रदेशाची कल्पना आपल्या राज्यघटनेत समाविष्ट केली. या स्वायत्त प्रदेशांना फक्त स्थानिक स्वराज्य संघटनेचेच स्वरूप देण्यात आले. चीनच्या राष्ट्रीय ऐक्याला तडा जाणार नाही याची खबरदारी घेतच स्वायत्ततेला मर्यादित वाव देण्यात आला.

चीनमध्ये असलेल्या विविध अल्पसंख्याक जमातीत मुस्लिम जमातही असून तिची लोकसंख्या १ कोटीच्या वर आहे. ही जमात प्रामुख्याने दोन गटात विभागली गेली आहे. हुई आणि वुईवर हे ते दोन गट होत. हुई मुस्लिम देशभर पसरलेले असले तरी कानसू व हाऊपै प्रदेशात त्यांची संख्या अधिक आहे. वुईघर मुस्लिम प्रामुख्याने सिकयांग भागात वसलेले आहेत.

इस्लाम हा केवळ धर्म नसून ती एक सामर्थ्यशाली राजकीय शक्ती आहे हे चिनी साम्यवादी ओळखूनच होते. चीनमधील मुस्लिम समाज इतर समाजापासून नेहमीच फटकून वागला. अशा विभक्तवादी मागणीच्या मागे धर्माची भावना तर होतीच, परंतु आपली जमात श्रेष्ठ श्रेणीची आहे असाही गंडाभिमान होता.

हा समाज स्वतःला एक निराळे घटक राष्ट्र समजत होता. १९५८ मध्ये 'कान्सू नॅशनॅलिटीज कमिटी'च्या झालेल्या बैठकीत मुस्लिमांच्या या स्थानिक राष्ट्रवादावर बराच प्रकाश टाकण्यात आला आहे. हा समाज चीनमधील समाजवादाच्या प्रक्रियेला सतत विरोध करीत राहिला. हा विरोध धर्माच्या व श्रेष्ठत्वगंडाच्या भूमिकेवरून केला जात होता. समाजवादी समाजरचनेत आमच्या मशिदींना गौणत्व प्राप्त होत आहे अशी त्यांची तक्रार होती. मुस्लिम समाजातील जे लोक राष्ट्रीय प्रवाहात पडून समाजवादी कार्यक्रमाचा पुरस्कार करीत होते त्यांना धर्मद्रोही व स्वार्थी समजले जात होते. राष्ट्रीय ऐक्याला विघातक अशी विधाने या समाजाकडून केली जात व आपल्या जमातीस खास वागणूक दिली पाहिजे, याचा आग्रह धरला जात असे. जगातील सर्व मुस्लिमांचे एक कुटुंब होय, अरबी ही त्यांची राष्ट्रभाषा होय व चीन ही मुस्लिमांची पितृभूमी (भारतात मातृभूमी म्हटले जाते) नाही अशा मतांचा सर्रास पुरस्कार होत होता.

कान्सूचे उपराज्यपाल व राष्ट्रीय प्रवाहास साथ देणारे एक मुस्लिम मा चींग न्येन यांनी एका लेखाद्वारे मुस्लिम प्रवृत्तीवर असाच प्रकाश टाकला आहे. मुस्लिम समाज धर्माच्या बाबतीत दोन गोष्टींचा आग्रह धरीत असे. संरक्षण (Protection)

व स्वातंत्र्य (Freedom). संरक्षण याचा मुस्लिमांनी काढलेला अर्थ मोठा अजब असे. देशाचा कायदा पाळण्याचे बंधन व देशप्रेमाचे कर्तव्य यापासून बचाव म्हणजे संरक्षण. स्वातंत्र्याचा अर्थ, स्वत:ला संपूर्ण धार्मिक स्वातंत्र्य व त्याप्रमाणे आपले जीवन घडविण्याची मुभा, असा असे. परंतु इतरांना धर्मावर विश्वास न ठेवण्याचे स्वातंत्र्य मात्र त्यांना मान्य नव्हते. थोडक्यात राज्यापेक्षा व राष्ट्रापेक्षा आपल्या धर्माचे स्थान वरचे असले पाहिजे असा मुस्लिम समाजाचा प्रयत्न असे.

चीनमधील मूळ रहिवासी जमात हॅन ही असून या जमातीशी सलोख्याने वागण्याचे हुई मुस्लिमांनी पथ्यच पाळलेले असे. हॅन जमातीच्या कामगारांबरोबर काम करण्याचे हुई नाकारीत असत. एवढेच नव्हे तर काही ठिकाणी हॅन लोकांना क्रूरपणे मारपीट केल्याच्या घटना घडल्या. इमामच्या अधिपत्याखाली इस्लामी राज्य स्थापण्याचे त्यांचे प्रयत्नही लपलेले नव्हते. 'पेकिंग पीपल्स डेली' या वृत्तपत्राने यावर प्रकाश टाकला आहे. इस्लामी राज्य स्थापन करण्यासाठी दंगेही घडवून आणले जात असत, असे या वृत्तपत्रांनी म्हटले आहे. पैचींग चॅंग व युआ चॅंग शू या दोन मुस्लिम नेत्यांनी चीनच्या राष्ट्रीय सरकारला विरोध करून मुस्लिम समाजाला दंगलीस प्रवृत्त केल्याचे निदर्शनास आणण्यात आले.

'पीपल्स डेली' या वृत्तपत्राने असेही म्हटले आहे की, मुस्लीम नेते कम्युनिस्ट पक्षाच्या किंवा हॅन जमातीच्या केवळ विरुद्धच होते असे नव्हे तर सिक्यांग भाग चीनपासून विभक्त करण्याचाही प्रयत्न केला गेला. स्वत:चे असे स्वतंत्र उद्धरस्थान स्थापण्याचा त्यांचा इरादा होता.

कम्युनिस्ट राजवटीने चीनच्या पुनरुत्थानासाठी जे जे प्रयोग करण्याचा उपक्रम चालविला त्या त्या उपक्रमाला चीनमधील मुस्लिम समाजाने कसून विरोध केला. कारण या समाजाला इतर कोणत्याही बाबीपेक्षा आपला धर्म व आपली जमात अधिक श्रेष्ठ वाटत होती. व आपण राष्ट्रीय प्रवाहात सामील झालो तर आपल्या श्रेष्ठत्वाला तडा जाईल या भीतीने या समाजाने सतत विभक्तवादाचा आश्रय घेतला.

## साम्यवादी उपाययोजना

साम्यवादी सरकार मुस्लिमांच्या या स्थानिक राष्ट्रवादाने त्रासून गेले. यावर कडक उपाययोजना करण्याचे साम्यवादी पक्षाने व सरकारने ठरविले.

'नॅशनल अफेअर्स कमिशन' चे उपाध्यक्ष बॅंगफेंग यांनी १९५८ मध्ये असे उद्गार काढले की, स्थानिक राष्ट्रवादाच्या नावाखाली पक्षाच्या ऐक्यास सुरुंग लावण्याचे लाड आम्ही चालू देणार नाही. सर्व जमातींना एका सांस्कृतिक पातळी-वर आणण्यासाठी आवश्यक त्या सुधारणा त्या त्या जमातीला पचतील अशा पद्धतीने करण्याचे मान्य करण्यात आले होते. परंतु कोणत्याही जमातीने धर्माच्या

नावावर सुधारणा टाळण्याचा प्रयत्न करता कामा नये, अशी ताकीदही त्याचवेळी देण्यात आली. मुस्लिम राष्ट्रवादास हळूहळू असाच शह देण्याचा प्रयत्न केला गेला. मुस्लिम प्रदेशातून त्यांच्या राजकीय व्यवहारावर साम्यवादी पक्षाचे नियंत्रण आणण्याचे पाऊल उचलण्यात आले. नंतर शिक्षणाला हात घालण्यात आला. धार्मिक शिक्षणाचे क्षेत्र संकुचित करण्यात आले. अरबी भाषा मुस्लिमांची धर्म-भाषा असल्यामुळे केवळ मशिदींमधून ती शिकवता आली तर शिकवावी एवढीच मुभा देण्यात आली. शाळांतून, कारखान्यांतून व ग्रामीण भागातून समाजवादाचे शिक्षण देण्यात येऊ लागले. धार्मिक संघटनांतून देशप्रेम, राष्ट्राने केलेल्या कायद्यांचे पालन व सद्‌वर्तन यावरच भर देण्यात आला. तिसरे पाऊल मोठे महत्वाचे उचलण्यात आले. धर्माच्या नावावर देशातील जनतेत जे कप्पीकरण झाले होते ते तोडण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. या प्रक्रियेस कम्युनिस्ट पक्षाने संयोगीकरण (Fusion) असे नाव दिले. पूर्वी मुस्लिम समाजातील शिकून तयार झालेले कार्य-कर्ते आपल्याच समाजात जाऊन समाजपरिवर्तनाचे कार्य करीत असत. परंतु या प्रयोगात साम्यवादी पक्षाला अपयश पत्करावे लागले. कारण अशा प्रकारचे कार्य-कर्ते आपल्या समाजातील बुजुर्गांच्या दबावाखाली येऊन पुन्हा स्वतःच्या धर्माच्या गोतावळचास पाठिंबा देऊ लागले. म्हणून एका जमातीच्या कार्यकर्त्यांनी दुसऱ्या जमातीत कार्य करण्याचा आदेश दिला गेला. त्यामुळे सामाजिक अभिसरणाची व व संयोगाची प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता निर्माण झाली. हे सर्व करीत असताना जादूच्या कांडीसारखा एकदम पालट होईल अशी पक्षाची मुळीच अपेक्षा नव्हती. बेंगफेंग यांनी म्हटल्याप्रमाणे परिवर्तनाची ही एक ऐतिहासिक प्रक्रिया होती. आजू-बाजूची परिस्थिती बदलते तसा समाजही बदलतो ही त्यांची धारणा होती. फक्त परिवर्तनाची ही प्रक्रिया जलद करावयाचे कार्य करावयाचे होते

सगळ्याच जुन्या परंपरा वाईट म्हणून त्या तोडून टाकल्या पाहिजेत अशीही भूमिका पक्षाने घेतली नाही. मुस्लिम समाजातल्या काही चांगल्या परंपरा कायम ठेवण्याची भूमिका त्यांनी घेतली. परंतु इस्लाममध्ये सांगितल्या आहेत म्हणून या परंपरा चांगल्या असे न मानता, काळानुरूप त्या सयुक्तिक होत्या म्हणून त्या ठेवल्या पाहिजेत यावर त्यांनी भर दिला.

इस्लामबद्दल व धर्मस्वातंत्र्याच्या कल्पनेबद्दल पक्षाने आपली भूमिका स्पष्ट केली ‘ कान्सू नॅशनॅलिटीज अफेअर्स ’ कमिटीने याबद्दल खालील विचार मांडले. “ धार्मिक श्रद्धांचे स्वातंत्र्य आमच्या राज्यघटनेनेच मान्य केले आहे. परंतु धार्मिक श्रद्धा बाळगणाऱ्या गटांनी देशप्रेम, कायद्याचे पालन व समाजवादाचा पुरस्कार या बाबींना मुळीच गौण लेखता कामा नये. धर्म हा राष्ट्रवादापासून अलग असून

[ पृष्ठ ५९ वर ]

बेरी द डेड

गॅस लाइट

# दोन देखणे नाटयप्रयोग

मुंबईत इंग्रजी नाटके नियमितपणे होत असतात. ही नाटके सादर करणाऱ्या मंडळचा मोजक्याच आहेत; परंतु त्या कष्टाळूपणाने एकामागून एक नाटयप्रयोग सादर करत असतात. या नाटकांची प्रयोगसंख्या मर्यादित असते; कारण ही नाटके पाहणारे प्रेक्षक मर्यादित असतात. मुंबईत होणाऱ्या सरसकट सगळया मराठी नाटकांना आश्रय देणारा मराठी-भाषिक प्रेक्षक मात्र या इंग्रजी नाटयप्रयोगांची दखल घेत नाही. कदाचित ही नाटके आपल्याला समजणार नाहीत, अशी त्याची ठाम समजूत झालेली असावी. सामान्य प्रेक्षकांचे सोडा; पण इंग्रजीशी चांगला परिचय असलेला किंवा मराठी रंगभूमीवर वावरणारा डोळस प्रेक्षकदेखील त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो तेव्हा ती समजूत नको तेवढी रुतलेली असावी, याची खात्री पटते. परंतु ती समजूत दूर करून, पूर्वग्रहरहित कुतूहलाने यातील एखादाच नाटयप्रयोग जरी आमचा मराठी रसिक पाहील तरी त्या मंडळयांचा आणि त्यांच्या नाटयकृतींचा तो कायमचा चाहता होईल, असे मी स्वानुभवाने सांगू शकतो.

नुकतीच अशी दोन इंग्रजी नाटके पाहण्याचा योग आला. एक होते 'सेंट झेवियर्स कॉलेज ड्रॅमॅटिक क्लब'ने सादर केलेले 'बेरी द डेड.' आणि दुसरे होते 'ब्रिटिश विमेन्स असोसिएशन'ने सादर केलेले 'गॅसलाइट.' पहिले आर्यविन शॉ या नाटककाराचे तत्त्वप्रधान नाटक तर दुसरे पॅट्रिक हॅमिल्टन या रहस्यमय नाटकांसाठी प्रसिद्ध असलेल्या नाटककाराचे रहस्य-प्रधान नाटक. ही नाटके जशी एकमेकांपासून प्रकृतिशः वेगळी होती तशाच त्यांच्या प्रयोगपद्धतीदेखील भिन्न होत्या.

अनंत भावे

युद्ध ही एक भयानक गोष्ट आहे. सुसंस्कृत माणसाची पशुवृत्तीच त्या निमित्ताने थैमान घालते; परंतु स्वार्थी उच्चपदस्थांकडून त्याचेही निर्लज्ज समर्थन केले जाते; भावना चेतवल्या जातात; महान तत्त्वांच्या रक्षणाचे इंद्रजाल रचले जाते; आणि प्रत्यक्ष युद्धात, राष्ट्राचे उमलते तारुण्य पाहता पाहता भस्मसात होते.–आधुनिक युद्धाचे हे विदारक सत्यस्वरूप 'बेरी द डेड' या नाटकातून प्रभावीपणे व्यक्त केले आहे. त्यासाठी नाटककाराने योजलेली मध्यवर्ती कल्पनाच मोठी विलक्षण आहे. प्राणांतिक जखमा होऊन चार सैनिक मृत्यु पावतात. त्यांना सन्मानपूर्वक मूठमाती देण्यासाठी त्यांचे सहकारी खड्डा खणतात. धर्मोपदेशक अनुरूप मंत्र म्हणू लागतो. मात्र हा विधी पुरा होण्याआधीच खड्ड्यामध्ये एकेक मृत सैनिक जिवंत होऊन उभा राहतो. इतक्या अकाली, जीवन डोळाभर पाहण्यापूर्वीच, युद्धाने केलेल्या जुलुमाविरुद्ध आता त्यांनी बंड पुकारलेले असते !...या अतर्क्य प्रकारामुळे हलकल्लोळ माजतो. आधी सेनाधिकारी, निरनिराळी युद्धखाती मग वृत्तपत्रे आणि धर्मसंस्था यांचे खरे स्वरूप, या प्रश्नाचा उलगडा करताना, उघडे होते. पण प्रश्न सुटत नाही. नंतर एका सेनाधिकाऱ्याच्या सूचनेवरून त्या सैनिकांच्या जवळच्या स्त्रियांना पाचारण करण्यात येते. कोणी बहीण, कोणी पत्नी, कोणी प्रेयसी तर कोणी माता असे त्यांचे नातेसंबंध आहेत. मृत्यूला आव्हान न देता खड्ड्यात गाडून घेण्याविषयी त्या सैनिकांचे मन वळवण्याची कामगिरी त्या स्त्रियांवर टाकण्यात आलेली असते. त्यांच्या भेटीचे प्रसंग त्या सैनिकांच्या पूर्वायुष्याचे दर्शन घडवतात. मात्र या भेटी होऊनदेखील सैनिक खड्ड्यात तसेच उभे असतात. कोणी एक जनरल तर या जिवंत मुड्यांना भेटून, झगमगीत वक्तृत्वाने त्यांच्या तारतम्यबुद्धीला जागे करण्याचा प्रयत्न करतो. शेवटी दुसरा एक जनरल अखेरचा उपाय योजतो. सैनिकांचे एक पथक बोलावण्यात येते आणि ते या जिवंत मुड्यांवर गोळ्या चालवून त्यांना पुन्हा मारण्याचा प्रयत्न करते ! गोळ्या सुटतात. पण मुडदे मरत नाहीत; उलट ते अधिक जिवंत होतात. आपली स्थिरता सोडून चाल करून येतात !

अनेक संदर्भांतून समृद्ध होणारा हा नाट्याशय रंगमंचावर प्रभावीपणे उभा करणे हे काम साधे नव्हते. परंतु सुदैवाने श्री. अलेक पदमसींसारखा चतुर आणि मुरब्बी दिग्दर्शक या नाट्यप्रयोगाला लाभला होता. नाट्यप्रयोगसंबंधित प्रत्येक घटक श्री. पदमसींनी अशा काही कौशल्याने हाताळला की, त्यामुळे हा नाट्यप्रयोग पाहणे हा एक अविस्मरणीय अनुभव झाला. रंगमंचावर मागील बाजूस उभे केलेले आघाडीचे आणि खड्ड्याचे दृश्य कमालीचे वास्तव होते. अगदी मागे असलेल्या पडद्यावरील बदलते रंग नाट्यगत आशय प्रसंगानुरूप खुलवत होते. याच पडद्याचा चित्रपटाच्या पडद्याप्रमाणे उपयोग करून, प्रसंगी त्यावर चित्रमालिका, निवेदनाला उठाव देत, सादर करण्यात आली. रंगमंचावरच्या दर्शनी भागात, आवश्यक त्या

ठिकाणी प्रकाशझोत टाकून, काही प्रवेश केले गेले. या सगळयाच्या जोडीला होते पार्श्वसंगीत. नाटकाचा परिणाम कितीतरी वाढवणारे. नाटकाच्या आशयाशी स्वाभाविकपणेच एकलय झालेले. वास्तविक पाहता या अनेकपात्री नाटकात भूमिका करणाऱ्या इंजिनियर्स कॉलेजच्या तरुणतरुणींचा हा संच मोठा कसलेला होता अशातला भाग नाही. स्वतंत्रपणे त्यातील काहीजणात जरूर उणिवा होत्या. तरीही त्यामुळे नाटकाच्या परिणामाला बाध आला नाही; कारण एका संघाचे घटक असल्याचे त्यांचे भान पक्के होते. दिग्दर्शकाला प्रस्तुत नाटक किती कळले होते याची ही आणखी एक खूण.

'गॅसलाईट' हे एकोणिसशेअडतीस साली लिहिलेले आणि गाजलेले नाटक. या नाटकावरून तयार केलेला चित्रपटसुद्धा कमालीचा लोकप्रिय झाला होता. बायकोला वेडी करण्याचा प्रयत्न करणारा कारस्थानी नवरा, त्याच्या गूढ वागण्यामुळे रंजीस आलेली त्याची केविलवाणी बायको, आणि तिला दिलासा देऊन नवऱ्याचे कारस्थान उलथून पाडून त्याला शासन करणारा हिकमती- आणि चिवट डिटेक्टिव्ह, अशी प्रमुख पात्रे. त्यांच्या जोडीला व्हिक्टोरियन वातावरण. एकूण सांकेतिक रहस्यप्रधान नाटकात असावी तीच सामग्री या नाटकात आहे. खरे तर या नाटकातील रहस्य आणि त्याची उकलदेखील तशी फारशी चित्तथरारक नाही.

आणि तरीही 'ब्रिटिश विमेन्स असोसिएशन'च्या वतीने श्री. गस कोल यांनी निर्मिलेल्या 'गॅसलाईट' या नाट्यप्रयोगाने प्रेक्षकांना खुर्चीला खिळवून ठेवले, यात शंका नाही. याचे श्रेय परिणामकारक वातावरणनिर्मितीला आणि समजूतदार नेमक्या अभिनयाला दिले पाहिजे. वातावरणनिर्मितीच्या संबंधात, अगदी क्षुल्लक वर्तमानपत्राबाबतसुद्धा तडजोड केली नव्हती, एवढे सांगितले म्हणजे अधिक काही सांगायची आवश्यकताच नाही. पत्नीची भूमिका करणाऱ्या कॅरोलिन ग्रेव्ह, पती झालेले डेरेक बाँड आणि डिटेक्टिव्ह मॉरिस हॉल, इतकेच नव्हे तर नोकराणींची कामे करणाऱ्या सँड्रा ली व कार्मेल मिस्त्री यांचा अभिनय स्वतंत्रपणे तर नेटका होताच; परंतु रहस्यप्रधान नाटकाला उपकारक अशा सांघिक प्रयत्नांचेही भान त्यांनी ठेवले. प्रकाशयोजना आणि रंगभूषा यांचादेखील आवर्जून निर्देश केला पाहिजे. ('गॅसलाईट' आणि 'बेरी द डेड' या दोन्ही नाटकांची रंगभूषा होती श्री. नाना जोगळेकरांची!)

असे हे दोन भिन्न प्रकृतीचे पण सारखेच यशस्वी नाट्यप्रयोग. अर्थात या मंडळयांची नाट्यनिष्ठा ठाऊक असल्यामुळे त्यात अनपेक्षित काहीच नव्हते. काही अपवाद वजा करता, या मंडळयांकडून सादर केला जाणारा प्रत्येक नाट्यप्रयोग हे एक देखणे शिल्प असते. नुसतेच देखणे नव्हे, तर चैतन्यशालीदेखील. माझ्या विधानाची सत्यासत्यता मराठी रसिकांनी चिकित्सापूर्वक पारखावी अशी त्यांस सादर विज्ञापना आहे.

□ □ □

रोज पाच हजार रुपयांचा खर्च करून
तीनशे कुटुंबांची सर्कस बिनबोभाट सांभाळणारे

# भाऊसाहेब कदम

एस्. ए. कुलकर्णी

"परमेश्वरावरची श्रद्धा हेच माझ्या यशाचं सार आहे – एका खेड्यातील एका गरीब शेतकऱ्याचा मुलगा दररोज पाच हजार रुपयांचा खर्च बिनबोभाट चालवून तीनशे कुटुंब जगवू शकतो आणि एखाद्या संस्थानाला लाजवील असा प्रचंड कारभार सांभाळतो हे कुणाच्या आशीर्वादानं? परमेश्वराच्या!" बाहेरून खोटारीप्रमाणे दिसणाऱ्या परंतु आत सोफा, खुर्च्या, पंखा यांची अद्यावत सजावट असलेल्या आपल्या ऑफिस–केबीनमध्ये बसून भाऊसाहेब – दि ग्रेट बॉबे सर्कसचे चालक – मला सांगत होते.

श्री. भाऊसाहेब कदम सांगली जिल्ह्यातल्या म्हैसाळ या छोटेखानी खेड्याचे. बेमतेम शेतीवर कसाबसा उदरनिर्वाह करणारे त्यांचे किसानकुटुंब. बालपणी आमटी-भाकर खाऊनही छोटे भाऊराव प्रथमपासूनच अंगापिंडाने सुदृढ अन् सशक्त. वयाच्या चौदाव्या वर्षीच चुलत्यानी त्यांना आपल्या समवेत एकदाचे सर्कशीत दाखल करून घेतले. हॉरिझाँटल बार, बॅलन्स, झूला इत्यादी कसरतींचा जसजसा सराव वाढत गेला तसतसा भाऊसाहेबांचा आत्मविश्वास वाढत गेला. सर्कशीत ते छोटी छोटी कामे करू लागले आणि त्यांना दरमहा पंधरा रु. पगार मिळू लागला. मनाची जिद्द दिवसेंदिवस वाढत गेली आणि आपणही मोठ्या पगाराचे 'ॲक्टर' का होऊ नये याचा ते अंतर्मुख होऊन विचार करू लागले. ताराबाई सर्कसमध्ये द. म. दोनशे रु. पगाराची नोकरी आल्याबरोबर त्यांनी देवल सर्कसचा निरोप घेतला. दोरीवरची कसरत, जगलिंग आणि बंदुकीची निशाण-बाजी ही कामे अगदी अचूक करून ते टाळ्या मिळवू लागले. पहिलीवहिली



बॉम्बे सर्कसचा
जगप्रसिद्ध सँडो

टाळयांच्या कडकडाटाची सलामी त्यांनी वयाच्या २१ व्या वर्षी घेतली आणि त्यांचा रांगडा देह नि रगेल ऊर अभिमानाने फुगून गेले. ताराबाई सर्कसमध्ये दोन वर्षे घालविल्यावर अहमदाबाद मुक्कामात त्यांना कार्लेकर सर्कशीचे बोलावणे आले. पगारात पन्नास रुपयांची वाढ झाली. एक वर्षानंतर तासगावच्या इंडियन बहादूर सर्कसमध्ये तीनशे रुपयांवर त्यांची नियुक्ती झाली. त्यांची लोकप्रियता तुफान वेगाने वाढत होती, आणि त्यांच्या आत्मविश्वासाची चढती कमान त्यांना एक वेगळी अंत:प्रेरणा देत होती. 'आपण स्वत:च एखादी सर्कस का उभारू नये?' असा विचार त्यांच्या मनात वारंवार येई. "निव्वळ नोकरीच किती दिवस करायची? आपण स्वत:च्या पायावर उभं राहावं हेच श्रेयस्कर" असा ठाम विचार त्यांच्या मनात प्रस्थापित झाला.

## स्वत:चा तंबू

सर्कस चालविण्याचा अनुभव नाही, त्यातील तंत्र अवगत नाही, त्यातील खाचा

खोचा ज्ञात नाहीत अशा अवस्थेतही त्यांनी मनाचा हिय्या करून आग्र्याचे श्री. महमद मियाँ यांच्या समवेत १९३० मध्ये आपली पहिली सर्कस बेंगलोरला स्थापन केली. सर्कशीतील आपले मित्र त्यांनी जमा केले. पण प्रथमग्रासे मक्षिकापातः या न्यायाने ही भागीदारी जेमतेम तीन महिनेच टिकली. भाऊसाहेब मोकळे झाले. बेंगलोरच्या एका मोठ्या छापखान्याचे मालक श्री. एम्. ए. कृष्णराव यांच्याशी त्यांचा जिव्हाळ्याचा स्नेह जडलेला होता. त्यांची भागीदारी स्वीकारून भाऊसाहेबांनी 'ज्युबिली सर्कस' चालू केली. केरळ भागातले ५०–६० कसरत-बहाद्दर गोळा केले. म्हैसाळचे काही जवान पठ्ठे त्यांनी आणले आणि मग ज्युबिली सर्कसचा दौरा सुरू झाला. म्हैसूर, केरळ, मद्रास या हिंदुस्थानच्या दक्षिण भागात ही सर्कस दोन वर्षे खेळत राहिली; पण म्हणावा तसा दैवाचा अनुकूल हात न मिळाल्याने ही सर्कसही बंद झाली आणि पहिले पाढे पंचावन्न या पद्धतीनुसार भाऊसाहेब पुनः एकवार इंडियन बहादूर सर्कसमध्ये दाखल झाले. इंडियन बहादूर-मध्ये दोन वर्षे आणि भुसावळच्या 'आर्यन सर्कस'मध्ये एक वर्ष त्यांनी नोकरी केली. पुनः एकवार स्वतःची सर्कस काढण्याचा मोका त्यांच्यापुढे आला. तो प्रसंग उद्बोधक आहे.

## सर्कसची भव्यता

रॉयल सर्कसचे मालक श्री. विश्वनाथराव यांची सर्कस मोडकळीस आली होती. एक तंबू, दोन राहुट्या आणि किरकोळ फर्निचर त्यांच्याकडे होते. जोधपूरला विश्वनाथरावांनी आपली सर्कस विकत घेण्याची विनंती भाऊसाहेबांना केली. त्यांनी अक्षरशः लकडाच लावला. पाचशे रुपयांची किंमत घासाघिशीने ३२५ रु. वर आली आणि भाऊसाहेबांनी सौदा पक्का केला. त्यावर्षी (१९३७) केवळ २० लोकांना बरोबर घेऊन सिंध – हैद्राबाद (आता पाकिस्तान) या शहरात भाऊसाहेबांनी 'ग्रेट बाँबे सर्कस'ची स्थापना केली. तोवर सर्कशीतील सर्व तंत्रांचा त्यांनी भरपूर अभ्यास केला होता. कंपनी निवड, जाहिरात, कार्यक्रमाची आखणी या सर्वच गोष्टी ते स्वतः करीत. टक्केटोणपे खात त्यांनी आपल्या सर्कशीला वाढविले. सर्कस बाळसे धरू लागली आणि भाऊसाहेबांचे सर्कस-मित्र आपण होऊन त्यांच्या सर्कशीत दाखल होऊ लागले. दोन हत्ती, एक वाघ, दोन सिंह, आठ घोडे आणि दोन खांबी तंबू एवढा पसारा वाढला. दरम्यान आणखी एक समाधानकारक घटना घडली. चार भागीदारांची 'व्हाइट वे सर्कस' ही त्यावेळी एक चांगली कंपनी होती. त्यातील एक भागीदार श्री. के. एम्. कुंजकिनन हे भाऊसाहेबांचे बालमित्र. ते आपण होऊन ग्रेट बाँबे सर्कसला येऊन मिळाले आणि मग तिची घोडदौड सुरू झाली. दुर्दैवाने दोन वर्षानंतर श्री. कुंजकिनन निवर्तले. त्यांच्या मृत्युपत्रानुसार त्यांची भागीदारी त्यांचे पुतणे श्री. बालगोपालन यांच्याकडे आली;

आणि १९५६ पासून बालगोपालन – भाऊसाहेब ही जोडी सख्या भावाप्रमाणे आजतागायत एकत्र आहे.

आज ग्रेट बाँबे सर्कसमध्ये १५ हत्ती, २० घोडे, १५ सिंह, २ वाघ, २ अस्वले, १ पाणहत्ती (हिपॉपोटॅमस), सी लायन, गोरिला, चिंपाझी इत्यादी १०० हून अधिक जनावरे आहेत; ३५० कसरत बहाद्दर तरुणतरुणी आहेत. ते पंजाब, बंगाल, केरळ, मद्रास, मध्यप्रदेश आदी सर्व भारतीय राज्यातले तर आहेतच; पण बोल्जियम, फिलिपाईन्स, ऑस्ट्रेलिया आदी परदेशी वीरही कंपनीत आहेत. सर्कशीचा रोजचा खर्च ५ हजार रुपयांचा आहे. ते एक अवाढव्य संस्थान बनले असून तिचा दैनंदिन कारभार चालविण्यासाठी ७ मॅनेजर व १ जनरल मॅनेजर रात्रंदिवस खपत असतात. कंपनीकडे चार-पाच नमुन्यांचे तंबू आहेत. मुक्कामाच्या ठिकाणची लोकसंख्या लक्षात घेऊन त्याला अनुसरून लहानमोठे तंबू उभारले जातात. मुंबई-मद्रास-कलकत्ता यांसारख्या मोठ्या शहरी दाहा-पंधरा हजार लोक बसू शकतील एवढा मोठा तंबू उभा केला जातो; तर इतर ठिकाणी मध्यम किंवा छोटेखानी तंबू उभारतात. कंपनीतील सर्व लहानमोठ्या कामगारांसाठी एकच जेवण दिले जाते. जेवणाचा निम्मा खर्च कंपनी सोसते आणि निम्मा खर्च ज्यांच्या त्यांच्या पगारातून कापून घेण्यात येतो. कामगारांचा दरमहा पगार पन्नास रुपया-पासून हजार रुपयांपर्यंत आहे. मुक्कामाच्या ठिकाणी स्थानिक डॉक्टरांचे साहाय्य




कामगारांच्या आजारपणात घेतले जाते. त्यासाठी प्रथमपासूनच खास संपर्क साधून तंत्रबद्ध व्यवस्था केली जाते. सर्कशीचा स्वतंत्र फोन असून त्याची पद्धतशीर जुळवाजुळव, हे मुक्कामातील पहिले महत्त्वाचे काम असते. मोठ्या तंबच्या आसपास दोन डझनाहून अधिक राहुट्या ठोकलेल्या असतात आणि त्यामध्ये बरेचसे कामगार राहतात. सर्कशीचा शिकारखाना नि भटारखाना संपूर्ण अद्यावत थाटाचा आहे. प्रत्येक ठिकाणी एक चांगला मोठा सिमेंट कॉंक्रीटचा पाण्याचा हौद बांधून घेण्यात येतो आणि त्यामध्ये पाणहत्ती सुरसुरत वावरू लागतो. त्याच्या वाहतुकीसाठी मुद्दाम बनविलेला ट्रक तयार आहे. सर्कशीच्या प्रमुख दारापासून एरिनापर्यंत केलेले मॅटिंग, शोभेच्या कुंड्या, सजावट, पांढऱ्या शुभ्र खुर्च्या, विस्तीर्ण गॅलऱ्या, प्रतिष्ठितांसाठी खास ठेवलेल्या कोचिस ही सर्व अद्यावत् व्यवस्था पाहून डोळे दिपून जातात. थोडक्यात म्हणजे चार-पाचशे कुटुंबियांचे एक आगळ्या पद्धतीचे सहकारी जीवन जगणारी एक प्रचंड सहकारी सामुदायिक जीवनाची आदर्श संस्था म्हणून ग्रेट बॉंबे सर्कसचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

भाऊसाहेबांनी ग्रेट बॉंबे सर्कसमध्ये अनेक क्रांतिकारी बदल केलेले आहेत. त्यामुळे भारतातच नव्हे तर सबंध आशियामध्ये या सर्कशीचे स्थान पहिले ठरून गेले आहे. इतकेच नव्हे, पण रशियन, जर्मन, झेकोस्लोव्होकिया, जपान आदी प्रगत देशातील प्रसिद्ध सर्कशींच्या मालिकेत तिने आपले स्थान पटकाविले आहे. "पाश्चात्य सर्कशींमध्ये अधिक शास्त्रीय तंत्रबद्धता असेलही; परंतु ग्रेट बॉंबे सर्कशीतील कार्यक्रम अधिक आकर्षक व अचाट साहसाचे आहेत हे निर्विवाद"— हे ऑस्ट्रेलियन हायकमिशनरांचे उत्स्फूर्त उद्‌गार संपूर्णतया यथार्थ आहेत. नेपाळचे राजे महेंद्र व राणी रत्ना या शाही दांपत्याने तर ग्रेट बॉंबे सर्कसला जगातला पहिला क्रम जाहीरपणे बहाल केलेला आहे. मृत्यूचा गोल आज बहुतेक सर्कशींमध्ये आढळतो; परंतु ग्रेट बॉंबेमध्ये फटफटीवरून बेमुर्वत संचार करणारे कसरतवीर ज्या पद्धतीने मृत्यूच्या गोलात फिरतात तसे कुठेही पाहायला मिळू शकत नाही. साधे ट्रॅपीजचे काम असले तरी ग्रेट बॉंबेची त्यामध्ये अभिनवता आढळते. तीस अंशाच्या कोनाने उभ्या केलेल्या तारेवरून (स्लॅंटिंग वायर) ग्रेट बॉंबेच्या पंचकन्या सायकलीवरून अशा काही बेमालूम पद्धतीने संचारतात की त्याला सर्कशीच्या इतिहासात तोड नाही! सारे हिंस्र प्राणी खुल्या मैदानात खेळविण्याचे साहसी धाडस ग्रेट बॉंबेमध्ये आहे. आपल्या कंपनीत प्रत्येक आयटेम सर्वस्वी अभिनव असावा, त्यात अभूतपूर्व क्रांती दिसून यावी यावर भाऊसाहेबांचा कटाक्ष आहे. त्यामुळे एकेका खेळाला पाच ते पंधरा हजारांचे उत्पन्न कमविण्याची विलक्षण धमक ग्रेट बॉंबेमध्ये आलेली आहे. भाऊसाहेबांचा सॅंडो जागतिक कीर्तीचा आहे – केवळ धंदेवाई खेळाडू म्हणून त्याला ऑलिंपिक सामन्यात उतरता येत नाही; नाहीतर त्याने एखादे सुवर्णपदक हमखास मिळविले असते!

## धोक्याचे जीवन

'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' असे सर्कसजीवनाचे वर्णन करताना भाऊसाहेब काही अपघातांच्या आठवणीने व्यथित होऊन जातात. ट्रॅपीझचे अत्युत्कृष्ट काम करणारा केरळचा वीर 'बालन' एका प्रयोगात ट्रॅपीझवरून खालच्या जाळीत अकस्मात पडला. त्याच्या मानेची नस तुटली आणि त्याला हॉस्पिटलकडे नेत असतानाच तो वाटेत मरून गेला. त्याची आठवण सांगताना भाऊसाहेबांच्या साहसी अंतःकरणालाही मायेचा पीळ पडतो. तसेच फिलिपाईन्सचा कसरतवीर हॅरी २५ फूट उंचीवरच्या सायकलवरून जेव्हा खाली कोसळला तेव्हा सर्कशीच्या तंबूत एकच हाहाःकार उडाला. त्याला जगविण्याची भाऊसाहेबांनी पराकाष्ठा केली; परंतु अखेर तो दगावला. अशा वेळी भाऊसाहेबांचे मायाळू पित्याचे मन अक्षरशः द्रवून जाते. आजही हॅरीच्या आठवणीने त्यांचा कंठ दाटून येतो. 'आपले वीर हे केवळ आपले नोकर नसून आपल्या नात्यातले आहेत' ही त्यांची धारणा या एकात्मतेच्या बुडाशी आहे. एकात्मतेची ते निव्वळ व्याख्याने झोडीत नाहीत; तसे जीवन ते जगताहेत! अपघातात सापडलेल्यांना वैद्यकीय मदत तर भाऊसाहेब देतातच; पण मृत्यु ओढवल्यास कुटुंबियांना भरपूर आर्थिक मदत देतात.

लातूरच्या मुक्कामात तर एकदा मोठा जिवावरचा प्रसंग गुदरला. सकाळच्या वेळी वाघ–सिंहांचे पिंजरे धूत असता एका नोकराने मागचा दरवाजा अनवधानाने उघडा ठेवला आणि चार अक्राळ विक्राळ सिंह बाहेर पडले. चोहीकडे एकच गडबड उडाली. तंबूत एरिनाच्या दाराशी जाऊन हे वनराज ऐसपैस जिभल्या चाटीत बसून राहिले. कामगारांची मुलेबाळे भीतीने आरडाओरड करू लागली. आता पुढे घडणार काय हे समजेनासे झाले. भाऊसाहेबांचे धाबे दणाणून गेले. चोहोकडे एकच धावपळ सुरू झाली; पण या वनराजांना मोठ्या हिकमतीने अडवून धरले आणि चुचकारत त्यांना पिंजऱ्याकडे आणले. पुनः पिंजऱ्यात त्यांना अडकविल्यानंतरच सर्वांचा जीव भांड्यात पडला. हे सिंहराज जर लातूरच्या गल्लीबोळात शिरले असते तर?–त्याचा विचारही आज भाऊसाहेबांना करवत नाही. पण एक मात्र खरे की, ही शिकविलेली जनावरे सहसा तंबूबाहेर जाण्याच्या भरीस पडत नाहीत अशी भाऊसाहेबांची आत्मविश्वासपूर्ण श्रद्धा आहे.

अशा अपघातांप्रमाणेच कंपनी एकाएकी भरमसाट तोट्यात येण्याचे प्रसंगही काही कमी गुदरत नाहीत. बरद्वानच्या एका मुक्कामात भयंकर वादळ उठले. वाऱ्याने नुसता धुमाकूळ घातला आणि ग्रेट बॉम्बे सर्कसचा भला मोठा तंबू तुटून पडला. खांबांची मोडतोड झाली. तंबू आवळणाऱ्या रस्सींच्या चिंध्या उडाल्या. जवळ जवळ २० हजार रुपयांचे अकल्पित नुकसान झाले. पुनः सारी जुळवाजुळव करण्यास एक आठवडा लागला. हरियाना राज्यातील नंदपूर या गावी तर सर्कशीवर मोठा दुर्धर प्रसंग ओढवला. मुसळधार पावसाची सरवत्ती सुरू झाली आणि पंधरावीस दिवस

तंबूत पाच सहा फूट पाणी उभे राहिले. बाहेर पाणी जाण्यास कुठेच वाव नसल्याने तंबूला एखाद्या विस्तीर्ण तलावाचे स्वरूप प्राप्त झाले. कंपनीचे खेळ तर बंद झालेच आणि अगाऊ ठरलेल्या दौऱ्याच्या कार्यक्रमानुसार नंदापूरला एकही खेळ न करता सर्कस मिरतला रवाना झाली. त्यावेळी जवळजवळ एक लाख रुपयाचे घवघवीत नुकसान झाले. कुचबिहारच्या मुक्कामातही तुफान पावसाने पंधरा दिवस खेळ बंद ठेवावे लागले आणि बिहारमधल्या किशनगड गावी मुक्काम हलवावा लागला. पन्नास हजारापर्यंत नुकसानीची झळ लागली. बेळगावच्या एका मुक्कामात सतत एकवीस दिवस पाऊस कोसळत होता आणि तब्बल दोन महिने तंबू उतरणेही अशक्य होऊन गेले. साठ सत्तर हजार रुपयांचे नुकसान झाले. " असे हिम्मत खचविणारे प्रसंग आम्हा सर्कसवाल्यांवर पुष्कळ येतात; पण आमची हिम्मत अचल राहते. वुई आर आल्वेज जॉली "–असे जेव्हा भाऊसाहेब मोठ्या धैर्याने सांगतात तेव्हा त्यांचे मनोमन कौतुक वाटते. सर्कस चालविणे हे येरा गबाळाचे काम नव्हे हेच खरे !

सर्कशीचा खराखुरा त्रास म्हणजे मुक्काम बदलण्याचा असतो. लोडिंग अनलोडिंगच्या कटकटीने जीव वैतागून जातो; नको हा सर्कशीचा व्याप असे होऊन जाते. पण सर्कशीत सुखापेक्षा दुःख जास्त हे समीकरण मनोमन मान्य करूनच पाऊल उचलावे लागते. जनावरे म्हातारी झाली, रोगराईला बळी पडली, थकली की पुन: बच्चे मंडळी गोळा करण्याची खटपटही औरच असते. बिहारमधील सोनापूर गावात दीपावलीच्या प्रसंगी हत्तींचा बाजार भरतो. दहा बारा हजार हत्ती विक्रीस येतात. तेव्हा लोक दिवाळीचा आनंद लुटत असतात. त्या सणासुदीला भाऊसाहेबांना बालगोपालन या भागीदारासह आणि बराच मोठा फौजफाटा समवेत घेऊन सोनापूरला तळ ठोकावा लागतो व नंतर बच्च्या हत्तींची खरेदी होते. मोठमोठ्या 'झू' मध्ये हिंडून पाहिजे ते जनावर अचूकपणे हेरून आणावे लागते. आफ्रिकन




जनावरे (गोरिला, सिंह, वाघ, चिंपाझी, पाणघोडे वगैरे) आणण्याकरिता जबरदस्त पत्रव्यवहार करावा लागतो; प्रसंगी खेपा घालाव्या लागतात; आणि जनावर आणल्यावर त्यांना शिकवीत बसण्याचा कंटाळवाणा खटाटोप करावा लागतो हे वेगळेच! 'सतत परिश्रम हे सर्कशीचे मूळ वर्म आहे– आम्हाला विश्रांती नाही' असे भाऊसाहेब हसत हसत सांगू लागले की त्यांचा दुर्दम्य आशावाद व प्रयत्नवाद आदर्श वाटल्यावाचून रहात नाही.

## अडचणी व महत्त्वाकांक्षा

सर्कशीतल्या अडीअडचणी आणि पुढील महत्त्वाकांक्षा याबद्दल बोलताना श्री. भाऊसाहेब म्हणाले, "आमची सर्कस श्रीनगरपासून खाली कन्याकुमारीपर्यंत तसेच कलकत्ता–आसाम ते कच्छपर्यंत सबंध देशाचे अनेक दौरे करून आली आहे। परंतु परदेशामध्ये–रशिया, जर्मनी, ऑस्ट्रेलिया आदी देशांमध्य हिंडून येऊन आमच्या कलेचा दिग्विजयी झेंडा भारताबाहेरही फडकवावा असे फार फार वाटते. ऑस्ट्रेलियाला जाण्याचे गेल्या वर्षी तर ठरत आले होते–यंदा जाणार हे निर्विवाद. परकीय चलन मिळणे अतिशय कठीण आहे. हीच मुख्य अडचण. सरकार सांस्कृतिक शिष्टमंडळांमध्ये गायक–वादक, नर्तक यांचा समावेश करून धडाधड त्यांना परदेशी रवाना करते–आमची कला सांस्कृतिक नाही का? खेळ–सर्कस आदी विषयींची सरकारी भूमिका अत्यंत खेदजनक आहे. निव्वळ करमणूककर माफ केला, रेल्वे कन्सेशन दिले म्हणजे भागले एवढाच सरकारचा कयास आहे. या मदतीबद्दल आम्ही सरकारचे जरूर आभारी आहोत. पण जेव्हा गंडांतर कोसळते तेव्हा सरकारने आम्हाला साहाय्य द्यायला नको का? आज देशात १३ सर्कशी आहेत–त्यापैकी ५–६ मोठ्या आहेत. लहान लहान सर्कशींचे हाल तर कुत्रा खात नाही! सर्कशीची जिवावरची खेळी जन्मभर खेळून या साहसी कलेची आम्ही जपणूक करून ती यथाशक्ती वाढवीत आलो आहोत, त्याला सरकारचे सक्रिय प्रोत्साहन नको का?"

"अवश्य पाहिजे!" मी एकदफे कबुलीजबाब दिला. त्यावर भाऊसाहेब हसून पुढे म्हणाले, "अहो, सध्या सरकारात तरुण रक्त आहेच कुठे? हैद्राबादला सर्कशीचे उद्घाटन करण्याचे सविनय निमंत्रण देण्यासाठी आम्ही राज्यपाल ना. खंडुभाई देसाई यांच्याकडे गेलो. तेव्हा त्यांनी काय उत्तर दिलं माहित आहे? "आय् नेव्हर सी सर्कस" आत्ता बोला! साहसाचे कौतुक तरुण रक्ताकडूनच होऊ शकते. जर्जर शरीराला कोठून येईल ही साहसी वृत्ती? ठिकठिकाणचे अधिकारी फ्री पासेससाठी एवढं नडवितात की त्याचं नाव ते! पाण्यात राहून माशाशीं वैर नको म्हणून आम्ही जुळवून घेतो सारं. आमचं खरंखुरं दैवत म्हणजे तंबूत श्वास रोखून आमची कामे कौतुकाने पाहणारे आमचे लक्षावधी प्रेक्षक बंधुभगिनी! त्यांच्याच प्रोत्साहनावर आमची आगेकूच चालू असते. प्रेक्षकांनाच आमचे सहस्रावधी प्रणाम!"

□ □ □

# अधांतर

अनंत
देशमुख

विद्याचे वागणे मला मुळीच आवडले नव्हते.

मी तिला तसे स्पष्ट सांगणार होतो. पण मला ती भेटलीच नाही. आणि भेटली ती अशा विचित्र अवस्थेत. माझा राग तर गेलाच पण उगीच सहानुभूती मात्र वाटत राहिली.

तिने असे विचित्र वागायला नको होते. उगीच पस्तावली. विचार करायला वावही न देता असा तडकाफडकी निर्णय घेणे बरोबर होते का? विद्या असे का वागली. हे कोडे अद्यापही सुटले नाही; आणि सुटूच नये.

पण काहीही असो. विद्याच्या अशा वागण्याने आपल्याला विचार करायला लावले एवढे खरे.

विद्या प्रथम भेटली जून ६४ मध्ये. त्यावेळी बॉटनीच्या डेमॉन्स्ट्रेटरसाठी तिने अर्ज केला होता. आणि मुलाखतीला आली तेव्हा इतकी मोकळी वाटली...उणीपुरी दोन वर्षे ती कॉलेजात राहिली. दोन वर्षांच्या वास्तव्यात तिने आपल्या लोभस व्यक्तीमत्त्वाने साऱ्यांना मोहून टाकले. वाणीत गोडवा होता. स्वभावात विनय होता. मिळून मिसळून वागण्याची सवय होती. समा-



योजन करायला तत्पर असे...कित्येक वेळा मी तिला ह्याबाबत छेडले होते. ती हलकेच म्हणायची, 'त्यात काय आहे सर, आपोआप जमते सारे...?

अशा गुणी मुलीचे जीवन अनपेक्षितपणे कलाटणी घेईल असे कुणालाही वाटले नाही.

पहिल्या वर्षी विद्या अबोल होती. कशातही भाग घेत नसे. फार हळवी वाटायची, पण माझी न् तिची चांगलीच ओळख झाली. ती आमच्याकडे यायची. तासंतास गप्पा मारायची. दिवस भरकन निघून जायचे. अधूनमधून ती माझ्याकडून निवडक पुस्तके न्यायची, मनःपूर्वक वाचायची. आणि त्या त्या विषयावर माझ्याशी चर्चा करायची. बी. एस्सीला तिला फर्स्टक्लास मिळाला होता, एम्.

एस्सीला जाण्याचा विचार होता. पण घरगुती अडचणींमुळे तिला आपला विचार बदलावा लागला होता.

दुसऱ्या वर्षी तिने कुठलीही ॲक्टिव्हिटी सोडली नाही. प्रत्येक फंक्शनला हजर राहायची. प्लॅनिंग फोरमपासून मराठी वाङ्मय मंडळापर्यंत सर्व कार्यक्रम ती आवडीने पहात होती.

त्या वर्षी गॅदरिंगला तिने एक एकांकिका बसवली. इतकी सुबक, कातीव एकांकिका माझ्या कॉलेजात प्रथमच आकाराला येत होती. तिची दिग्दर्शनातली सफाई वाखाणण्याजोगी होती. आम्ही खूप कोडकौतुक केलें की, ती लाजून चूर व्हायची. म्हणायची, "चला सर, तुम्ही फारच स्तुती करता..."

—त्यानंतर ती आमचे कॉलेज सोडून गेली. जाताना मला फार वाईट वाटले. तिलाही चुकल्यासारखे झाले. मग मीच तिला म्हटले, "हा मराठीच्या प्राध्यापकाचा इवलासा संसार...पण कधीही विसरायचे नाही. केव्हाही ये...अगदी आपल्या माणसासारखे..." सौ...नेही तिला वारंवार बजावले. जाताना मी तिच्या हातात 'सावित्री' ठेवली...(नंतरच्या पत्रातून तिने प्रथम काहीच न कळल्याचे लिहिले होते. नंतर तिचे पत्रच आले नाही.)

मध्यंतरीच्या काळात ती एम्. एस्सी करते आहे असे कुणाकडून तरी कळले. पुण्याला गेल्यावर तिची गाठ घ्यायची, तिच्या अडचणी सोडवायच्या आणि भरकन निघून गेलेल्या स्मृतींना उजाळा द्यायचा, असे मी मनोमन ठरवत आलो होतो. परंतु पुण्याला जायचे भाग्य माझ्या नशिबी इतक्या लवकर लिहिले नव्हते. आणि मी जेव्हा पुण्याला गेलो तेव्हा तिला चांगली समर व्हॅकेशन लागलेली. ती गावी केली असणार.

त्या वेळमध्ये आम्ही कन्याकुमारीची टूर केली. आम्ही फक्त दोघेच. सौ. आणि ची. सौ. म्हणत होती; "विद्याला बोलावून घ्या." ह्यापूर्वी मी, विद्याने आणि आणि सौ. ने अशा ट्रिप्स्च्या छानछोकी कल्पना लढवल्या होत्या...प्रत्यक्षात मात्र काहीच घडले नव्हते. आमची समर व्हॅकेशन मस्त गेली...आणि पुन्हा रुटीनमध्ये मश्गूल राहिलो. जुलईमध्ये विद्याचे एक छोटेसे पत्र आले. "तुमची, वहिनींची (म्हणजे सौ. ची) फार फार आठवण येते. दिवाळीच्या सुट्टीत कदाचित येईन. आणि एक गंमत..." म्हणून तिने ते वाक्य अपुरे सोडले होते.

विद्याच्या गंमतीचे अंदाज घेणारे अनेक तर्क करत मी आणि सौ. ने कित्येक रात्रींची उसवण केली होती. पुन्हा विद्याचे पत्र नाही. पत्र लिहिणे तिला जमतच नसे. इथे असताना घरी पत्र लिहीत नसे. पंधरवड्यास तिचे वडिल येऊन जात. पत्र लिहिणे हा तिचा आवडता विषयच नव्हता. अरशी हळवी.

मध्यंतरी अचानक तिचे वडिल भेटले. विद्याचे खूप खूप कौतुक करत होते. आता ती एम्. एस्सी होणार होती. लवकरच लग्नाचे घाटत होते. एका मोठ्या

विचारवंताची सून होण्याची चिन्हे दिसत होती. मलाही बरे वाटले. माझ्या डोळ्यां-समोर तिची मेंदी लावलेली हाताची पेरे उभी राहिली. गप्पा गोष्टीत मी एक आवंढा गिळला. आणि तिच्या वडिलांनी धोतराच्या टोकाने डोळे पुसले. कृतकृत्य झाल्याचे टपोरे अश्रु त्यांच्या गालावर ओघळले. मग मीच म्हटले, "विद्या नशिब-वान बाबा, चांगली असामी गाठलीय. तसे तिच्यातही नाव ठेवायला जागा नाही."

आणि त्या दिवाळीत विद्या माझ्याकडे आली. एकटी नाही तर होऊ घातलेल्या यजमानांबरोबर. माझ्याकडे चांगला आठवडा भर राहिली. जोडा छान वाटला मला. तो चांगला अकाउंटंट होता. सारे ठीक झाले. मी विद्येला म्हटले, "लकी आहेस."

त्यावर ती नुसती हसली. खूप बरे वाटले मला.

आणि ती निघून गेली.

पुन्हा पत्रव्यवहार नव्याने सुरू झाले. लग्नाचे मुहूर्त काढण्यात आले. जमवाजमव सुरू झाली. एक नवे चैतन्य खळाळू लागले...

आम्ही विद्याच्या लग्नाचे बेत आखत राहिलो. विद्याला काय घ्यायचे यावर आमच्यात खडाजंगी व्हायला लागली. सोफा घ्यायचा माझा विचार, तर सौ. चा वेगळाच हट्ट. एक सुंदरशी गोल्डन रिंग करायची, तिचा अट्टाहास. बऱ्याच वेळा मी तिची रेवडी उडवत असे. तरीही तिचा निर्धार कायम असे. यात कोण जिंकणार यावर पैजही ठरली. चिठ्ठ्या टाकण्यात आल्या. तिला खिजविण्याची एकही संधी मी सोडली नाही. चिठ्ठी कुणी उचलायची हा एक उपप्रश्न मध्येच छान रंगला. शेवटी मीच उदार होऊन म्हटले, "तूच चिठ्ठी उचल." सौ. चे डोळे थरारले. पदर ओला झाला. हो ना करता तिने चिठ्ठी उचलली. तिने ती माझ्याकडे दिली. आणि म्हणाली; "तुम्ही जिंकला असाल तर मी जिंकलेच की. अर्धांगी आहे तुमची" हा युक्तीवाद जरा गारवा निर्माण करून गेला.

क्षणभर दाट शांतता पसरली. चिठ्ठी उघडली. सौ.च्या हातात दिली. तिने माझ्याकडे पाहून मंद स्मित केले. मला पराभव पत्करावा लागला होता. "संध्या-काळीच सराफाकडे जाऊन ऑर्डर नोंदवायची."

मी हुंकार दिला.

त्यानंतर चार-पाच दिवसांनीच विद्याचे पत्र आले. त्या चार ओळींनी आमच्या उत्साहावर पाणी घातले होते. विद्याच्या लग्नाचे लांबणीवर पडले होते; इतकेच नव्हे तर त्या मुलाने तिला साफ नकार कळविला होता, कुठल्याही प्रकारचे कारण न दाखवता. "मला लग्न करायचे नाही, तुम्ही काही करायला मोकळे आहात." हा माणूस एवढा का बिथरला काही कळायला मार्ग नव्हता. विद्याचे वडिल म्हणाले, "काय दोष असेल तो दाखवा, सुधारण्याचा प्रयत्न करू." पण त्यांच्या विनंती, आर्जवाला किंमत राहिली नव्हती.

झाले. विद्याचे जीवनच बदलले. आपल्यात काहीतरी दोष आहे, उणिवा आहेत, वैगुण्ये आहेत असे तिला वाटायला लागले. न्यूनगंडाने तिला पछाडले. पूर्वीची अल्लड विद्या केव्हाच संपुष्टात आली. आता राहिली होती ती विद्या फार वेगळी. अबोल, मितभाषी, वैतागलेली...

मध्यंतरीच्या काळात एकदा मी तिच्याकडे जाऊन आलो. किती विक्षिप्त वागली ती. मलाच मग सहन झाले नाही. मी तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. माझ्या हाताखाली शिकून गेलेल्या एका चांगल्या विद्यार्थ्याचे नाव पुढे केले; आणि तिच्यासाठी मी जातीने प्रयत्न करतो असे आश्वासनही दिले. पण काही उपयोग झाला नाही. 'सर, तुम्ही माझ्यासाठी कष्ट घेत आहात...फॉर माय सेक स्टॉप इट...'

त्यानंतर काहीच कळले नाही. मीही विद्याच्या बाबतीत नर्व्हस झालो. सौ. अधूनमधून, 'विद्याचे पत्र आले का ?' न आल्यास तुम्ही लिहा ? म्हणून बजावू लागली.

विद्याच्या विषयाने मी उदासीन झालो...

त्यानंतर मी ते कॉलेज सोडले.

विद्याचा विषय आता माझ्या पलीकडील होता. किंबहुना मी विद्याला विसरून गेलो होतो. इथल्या नव्या कॉलेजात माझे चांगलेच बस्तान बसले होते. सारे काही सुरळीत जात होते. आणि अचानक विद्याच्या वडिलांच्या मृत्यूची बातमी कळली. सारा भूतकाळ उभा राहिला. विद्याने त्याची आणि माझी प्रथम करून दिलेली ओळख, विद्या एम्. एस्सी करते. ठीक चाललं...आणि तेव्हाच त्यांनी विद्याच्या एन्गेजमेंटची बातमी दिली होती. त्यांच्या जाडया भिंगाच्या चष्म्याखालून खळ्कन निखळलेले दोन अश्रु माझ्या हृदयात घर करून राहिलेत.

पुन्हा विद्याबद्दल मला उत्सुकता लागली. पोरगी काय करते, कुठे आहे, तिचे लग्न झाले असेल का ??

आणि पर्वा विद्या मला भेटली; माझ्या चेंबरमध्ये मी कामात गर्क असताना. कुणाचीही परवानगी न घेता ती आत आली. समोरच्या खुर्चीवर न बसता टेबला-वर बसली.

"ओळखलंत मला ?"

मी स्मृतीशी सारीपाट खेळलो.

समोर टेबलावर बसलेली व्यक्ती अंगाने भरलेली वाटली. चेहऱ्यावर विलक्षण भाव जाळे विणत होते. दृष्टीत पारध्र टिपण्याची भेदकता आढळली. पोटीम्याच्या खाली पोटाला लडी पडली होती. अतिशय रुंद गळयाचा ब्लाऊज तिने घातला होता...गळयात मंगळसूत्राचा पत्ता नव्हता. सारेच विचित्र वाटले मला.

मी आनंदाने ओरडलोच, "विद्या, हो विद्याच तू ?'

ती नुसती हसली.

"काय करतेस आता? तुझे वडिल गेल्याचे कळले; फार वाईट वाटले. आई कशी आहे?"

खळकन काच फुटावी तसे तिचे हासू फुटत होते. भावविवश होऊन मी प्रश्नांची सरबत्ती चालविली होती. ती मात्र हेतूपुरस्सर दुर्लक्ष करत होती.

"काय करतेस हल्ली?"

"केमिस्ट म्हणून आहे."

"किती मिळतात?"

"मिळतात पुरेसे."

"एकटीच रहातेस?"

"म्हटलं तर एकटी. नाहीतर कधीकधी तो येतो. असतो आपला एक दोन दिवस. नंतर जातो कंटाळला की."

–अशी तिरकस उत्तरे.

"कोण तो?"

"आहे आपला..."

"काय नाव?"

"फ्रँसिस"

मी गप्प रहातो.

"आश्चर्य वाटले असेल नाही? काही करत नाही तो. काडीचीही अक्कल नाही त्याला. तरीही संसार करतो आम्ही."

"हुं."

"आता कुठे निघालीस." – मी.

"बॉस कडे." घाऱ्या डोळ्यांतून स्नेह पाझरला. "बोलावणं आलंय्. गेलंच पाहिजे. जाते कधी कधी..."

एका लाटेने दुसऱ्या लाटेला खो द्यावा तशी माझ्या आश्चर्याची अवस्था होती. खूप वेळ ती बडबडत होती...

तिच्या बोलण्याचा अर्थ मला उमगलाच नाही. ती कधी निघून गेली ते मला कळलेच नाही.

तिचे जीवन भोवऱ्यासारखे आहे. पण छे, भोवरा स्वतःभोवती गिरक्या घेत असतो, स्वतःच्या तालावर. – आणि विद्या? ती भटकत जात आहे. तिच्या पायाखालील वाळू घसरत नाही ना? पण तिला त्याची काय पर्वा? तिचे जीवन म्हणजे एक पीस आहे अधांतरी चालणारे, दिशाहीन.

◻ ◻ ◻

# वर आभाळ बाकी बर्फ



## ३१ मे १९६६

आज आम्ही Camp 1 ला जाणार. वाट माहित आहे. कॅम्पची जागा पण ठरली आहे. अगदी आरामात जाऊन देखील फार तर ४–५ तासांची चढण आहे. आम्ही स्वस्थपणे सर्व तयारी करतो.

प्रत्येकाने स्वतःचे सामान पाठीवर रकसॅकमध्ये घ्यायचे असे ठरले आहे. आम्हाला ३–४ दिवस तरी वरच्या कॅम्पमध्ये रहावे लागेल असा अदाज आहे. अंगावरचे कपडे बदलायचा प्रश्नच नाही. वर बरोबर न्यायचे म्हणजे जादा लोकरीचे कपडे, पायमोजे, बर्फावर घालण्यासाठी काळा चष्मा, कॅमेरा, दुर्बीण वगैरे;

# आनन्द चान्देकर

## सह्या

कंगवा. आरसा व दाढीच्या सामानाचा उपयोग नाही. तेव्हा वर आम्हाला फारसे सामान न्यायचे नाही. मी व देसाई मिळून एकच रकसॅक घ्यायचे ठरवतो. आम्ही पाळीपाळीने ती पाठीवर घेऊ. अरोरा व प्रकाश मात्र वेगळी रकसॅक ठेवतात.

७॥ वाजता आम्ही निघतो. देसाईंनी आमची रकसॅक घेतली आहे. जमिनीवर बर्फाचा पातळ थर आहे. पण धोका काहीच नाही. पाय टेकताच वरचा पापुद्रा फोडतो, व खाली मातीत पाय जातो. पहिली चढण संपली. आम्ही थांबतो. लोपसांग व दोरजे पुढे गेले आहेत. प्रकाश माझ्याबरोबर आहे. देसाई मागे राहिलेत. पाठीवरच्या वजनाने त्यांचा वेग मंदावला आहे. ह्या उंचीचा हा परिणाम आहे. सर्व हालचाली मंद लयीतच होतात. उगाच वेग वाढवला की लागलीच धाप लागते. लयबद्ध व शक्तीचा कमीत कमी उपयोग करून चढणे यातच गिर्यारोहणाला महत्त्व आहे. येथेच असे नव्हे तर सह्याद्रीत देखील. शहरात चालणे व डोंगरावर हिंडणे ह्या दोन गोष्टी अगदी वेगळ्या आहेत. डोंगरात हिंडणाऱ्यांचे पायच संवेदनाक्षम बनतात. ते आपोआप लयीत पडतात व योग्य प्रकारे जमिनीची पकड घेतात.

अरोरा शेरपांच्या बरोबर पुढे गेला आहे. हमाल येथे विश्रांती घेत बसलेत. आम्ही त्यांच्याबरोबर रहातो. ते नेहमीच जवळचा व सोपा रस्ता काढतात. पाठीवरच्या वजनाने आता तर त्यांचा वेग चांगलाच मंदावला आहे.

आम्ही पुढे निघतो. आता एक लँड स्लाइड ओलांडावयाची आहे. पलीकडेच एक प्रवाह आहे. देसाई मला दिसत नाहीत. बरेच मागे आहेत. मी त्यांना हाक मारतो. काही उत्तर नाही. थोड्या वेळाने ते आमच्या बरेच वर व लांब अंतरावर दृष्टीस पडतात. आम्ही त्याना हाताने खुणा करून आमच्याकडे येण्यास सांगतो. आणखी एक लँड स्लाईड. अशा स्लाईडमधून चालण्याची एक युक्ती आहे. झपाझप पावले टाकीत जवळजवळ धावतच हे भाग ओलांडावे लागतात. नाहीतर पावले घसरतात. लहानलहान slides सुरू होतात. ते धोक्याचे असते.

आम्ही प्रवाह ओलांडतो व पलीकडे बसतो. देसाई आमच्याजवळ येऊन पोहोचले

आहेत. आम्ही पोहोचताच हमाल पुढे चालू लागतात. त्यांच्यात व आमच्यात एक मूक करार झाल्यासारखा आहे. ते आमच्या जरा पुढे आहेत. चांगली जागा विश्रांतीसाठी दिसली की ते बसतात. आम्ही त्या जागेजवळ आलो की ती आम्हाला रिकामी करून देऊन ते पुढे कूच करतात. जर जागा भरपूर असली तर ते पण आमच्याबरोबरच बसतात. मग आम्ही सिगारेटस् ओढीत त्यांच्याशी गप्पा मारतो. आता आमच्याबरोबर १० हमाल आहेत. बाकीच्यांना परत पाठविले. हे १० शेवटपर्यंत आमच्याबरोबर रहातील. या प्रत्येक हमालाजवळ २१ किलो बोजा आहे. पण ह्या उंचीवर एवढा बोजादेखील चांगलाच जाणवतो. अगदी कष्टाचे काम. पण ते आनंदी आहेत. अजून एकाही हमालाने माझ्याकडे कसलीही तक्रार केली नाही.

हळू हळू आम्ही उंच उंच जात आहोत. आता रकसॅक माझ्या पाठीवर आहे. माझा वेग मंदावला आहे. देसाईंची तब्येत नेहमीसारखी ठणठणीत वाटत नाही. ते थकल्यासारखे दिसतात. आता ढग येऊ लागलेत. आम्ही १५००० फुटांच्या वर असणार. हवेत गारठा आहे. वारा सुटला आहे. आमच्या अंगात उत्साह आहे. वातावरण फारच सुंदर. पण वेग वाढवता येत नाही. आम्ही थांबत थांबत वर जातो.

फुटलेल्या दगडांच्या राशीतून आम्ही चढत आहोत. जिकडेतिकडे दगड पडलेत. एकावर एक असे प्रचंड दगड अस्ताव्यस्त पडलेत. काहींचा तर तोल कसा रहातो ह्याचे आश्चर्य वाटते. एका दगडावर मी पाय टेकला. तो Sea Saw सारखा एकदम हलू लागला. मी पटकन बाजूला उडी मारली. पण तो दगड मात्र पडला नाही. मधूनमधून बर्फाच्छादित भाग. आम्हाला जपूनच पावले टाकावी लागतात.

आमच्या कॅम्पची जागा आता दिसू लागली आहे. लोपसांग, दोरजे व पोहोचलेले काही हमाल तंबू उभारीत आहेत. आम्हाला खूप मोठा बर्फाच्छादित भाग ओलांडायचा आहे. प्रत्येकजण त्यातून स्वतःचा मार्ग काढीत आहे. प्रत्येकाची स्वतंत्र पावले बर्फात उमटतात.

१२॥ वाजता मी तळावर पोहोचतो. तंबू उभारले जात आहेत. रकसॅक खाली ठेवून मी पुढे जातो. आमचा मोठा तंबू Conference tent उभारला आहे. आम्ही चौघे–मी, प्रकाश, अरोरा व देसाई त्याच्यात राहू. थोडी दाटी होईल पण त्याला इलाज नाही. असे नेहमीच करावे लागते. जसजसे वरच्या कॅम्पवर जावे. तसतसे जास्त सामान तेथे पोहोचविणे कठीण होत जाते. म्हणून दोन माणसांच्या तंबूत तिघांनी व तीन माणसांच्या तंबूत चौघांनी रहावे लागते. काही वेळेला तर दोन माणसांच्या तंबूत ४ गिर्यारोहकांनी रात्र काढली आहे.

दोरजे स्वयंपाकघर तयार करीत आहे. काही खडकांच्या आडोशाला त्याने एक मोठा खड्डा खणला आहे. त्याच्यात स्टोव्हसाठी वाऱ्यापासून सुरक्षित अशी जागा

केली आहे. जवळच कुंदन, बहादूर व आमच्या सामानासाठी एक तंबू उभारला आहे.

मी माझी रकसॅक आणण्यासाठी परत जातो. वाटेत लोपसांग व दोरजे त्यांचा तंबू उभारीत आहेत. नेहमीच ते आमचे तंबू उभारल्यानंतरच स्वतःचा तंबू उभारतात. मी रकसॅक खाली ठेवून त्यांना मदत करतो. आज आमच्या कॅम्पमध्ये एकूण ३ तंब आहेत. उद्या बाकीचे सदस्य आल्यावर आणखी दोन उभारावे लागतील. आमचे तंबू बर्फावर दक्षिणाभिमुख आहेत.

आकाश ढगांनी भरले आहे. झोंबरा वारा सुटला आहे. तंबूच्या बाहेर उभे रहावत नाही. आम्ही आतच बसतो.

दुपारचे १॥ वाजलेत. आता जेवण. आम्ही लोपसांग व दोरजेला बोलावतो. चहा तयार आहे. आम्ही सर्व आमच्या मोठ्या तंबूत बसतो. लोपसांगने सामानातून काही फळांच्या रसाचे डबे आणले आहेत. [मला ते जरा खटकते. उगाचच. त्याने कोणाला तरी विचारावयास हवे होते असे वाटते. पण आता आमचे संबंध नोकर व नोकरी देणारे असे नाहीत. ते आमच्यापैकीच झाले आहेत.

जेवणानंतर लोपसांग व दोरजे आणखी पुढे जातात. आम्ही तंबूच्या बाहेर उभे राहून पहातो. आम्हाला ते समोरच्या हिमनदीवर अगदी सहजतेने वावरताना दिसतात. काही वेळाने ते दिसेनासे होतात.

आकाश अजून ढगाळलेलेच आहे. काही बर्फाचे पुंजके तरंगत खाली येतात. थोड्या वेळाने बर्फ पडू लागते. ४ वाजता लोपसांग व दोरजे परत येतात. त्यांनी आमच्या पुढील कॅम्पची जागा शोधून ठेवली आहे.

बर्फ थांबते. आता आकाश निरभ्र आहे. ऊन पण पडले आहे. आम्ही सर्व तंबूच्या बाहेर उद्याच्या कार्यक्रमांचा विचार करीत बसतो. लोपसांग उद्यासाठी सामान बाजला काढीत आहे. " Sir, tomorrow we will go ahead to open the route " तो म्हणतो. खालून वर येणाऱ्या सदस्यांसाठी आम्हाला थांबत येणार नाही. एक दिवस फुकट जाईल. आम्ही आपापले सामान शोधतो. मुख्य म्हणजे Crampons. देसाई व प्रकाश त्यांच्या बुटांचे Crampons शोधत आहेत. शेवटी ते खालीच राहिले असे दिसते. अरेरे, उद्या त्यांना आमच्याबरोबर पुढे येता येणार नाही.

" साब, नमक और मसाला नही है " कुंदन ओरडतो. आम्ही सर्वजण नेमक्या या वस्तू वर आणण्यास विसरलो. आता जेवण कसे करणार ? दोरजे स्वयंपाकघराकडे धावतो. रात्रीच्या जेवणात आम्हाला भात व वरण मिळते. पापड आहेच. दोरजेने मीठ-मसाल्याऐवजी लोणचे वापरले. चव चांगली लागते.

कुंदन व बहादूरला त्यांच्यासाठी आणलेले गरम कपडे आज आम्ही दिले. पण त्यांना झोपायच्या पिशव्या मात्र आम्हाला देता आल्या नाहीत. मुंबईला राहिलेल्या आमच्या ३ पिशव्यांची या वेळेस फार आठवण झाली. त्यांची थोडी तरी सोय

होईल अशी मी आशा करतो. कुंदनचे डोके दुखत आहे. बहुधा उंचीचा परिणाम असावा. उंचीवर ऑक्सिजनच्या कमतरतेने निरनिराळ्या लोकांवर निरनिराळे परिणाम होतात. डोके दुखणे, अन्न बेचव लागणे, गरगरणे व कधी उलट्यासुद्धा होतात. आमचा कॅम्प १६००० फुटाच्या वर आहे.

उद्या सकाळी लवकर निघाले पाहिजे. आम्ही लवकरच तंबूत जातो. येथे शेकोटी नाही. १६००० फुटावर चांगलीच थंडी वाजते. मी उद्याचा विचार करीत आहे. कसा असेल चढ ? कोणी न चढलेल्या पर्वतावर मार्ग काढायचा. हा एक नवीन अनुभव. उत्सुकता आहे, थोडी भीती पण. पण लोपसांग व दोरजे बरोबर आहे. त्यांची आम्हाला फारच मदत झाली. चढण सोपी वाटते. फक्त शिखराजवळच्या घळीबद्दल मला काळजी वाटते.

बराच वेळ मला झोप लागत नाही. मी तंबूच्या बाहेर पडतो. स्वच्छ आकाश. जवळ जवळ पोर्णिमेचा चंद्र आहे. आकाशातले तारे वेगळ्याच तेजाने चमकतात. आसपास स्वर्गीय सौंदर्य आहे. चांदण्यात आसपास बर्फाच्छादित पर्वत उजळून निघाले आहेत. पांढऱ्या बर्फावर चंद्राचे चांदणे. मधून मधून काळे खडक. आसपास एक झुडूप नाही, की गवताची काडी नाही. सकाळी ऐकू येणारा खालून वहाणाऱ्या पाण्याचा आवाज पण येत नाही. ते आता गोठले आहे. संपूर्ण शांतता आहे. हे सर्व स्वप्नवत् व नकली वाटते. खरोखरच आपण पृथ्वीवर आहोत का ? मधेच एखादा दगड घसरतो. तेवढाच आवाज होतो. मी दचकून त्या बाजूला पहातो. कोणी आहे का ? पण तो केवळ भास. मला आमची सह्याद्रीतील स्वप्नांची आठवण येते. ती सर्व खरी होत आहेत. आमची सर्व धडपड आठवते. आम्हाला मदत करणाऱ्या अनेक व्यक्ती. पण ते सर्व दूर आहेत. इथे आम्हीच व समोर आमचे शिखर. आम्हीच स्वतःला सामोरे ठाकलो आहोत. आम्ही शिखर गाठू वा न गाठू. फार समाधान आहे.

पण सामान्य जीवनाचे बंध तुटलेले नाहीत. येथेच या दगडावर बसून रहावे. आपली आवडती व्यक्ती जवळ असावी व चंद्र ह्या पर्वतावरून उगवून मावळताना पहावा असे वाटते. मी स्वप्नरंजनात आहे. पण भानावर येतो. थंडी फार आहे. विश्रांती पण आवश्यक आहे. मी माझ्या झोपायच्या पिशवीत परत जातो.

## १ जून

कॅम्प १ मधील पहिलीच सकाळ. १६००० फुटावर थंडी चांगलीच वाजते. कुंदन चहा आणतो. "कल रातको कैसा था कुंदन ?" मी विचारतो. "साब बहोत थंड था." तो म्हणाला. खरे आहे. रात्री त्यांना फारच थंडी वाजली असणार.

त्यांना आमच्यासारखी रबरी गादी व झोपायची पिशवी नव्हती. ते सामानांच्या पिशव्यांवरच आम्ही दिलेले गरम कपडे घालून व आपल्या पांघरुणात गुरफटून पडले होते; पण त्याबद्दल तक्रार नाही. काम करण्यात चुकारपणा नाही.

लोपसांग व दोरजे निघायची तयारी करीत आहेत. लोपसांग सामान पुन्हा एकदा तपासून घेत आहे. ते सर्व सामान – दोर नॉयलान व मनीला, Pitons, Carabiners रकसॅमध्ये तो घालतो. इकडे दोरजेने पॅटिस बनवले आहे. व दोन तीन थर्मास भरून कॉफी. बरोबर घेण्यासाठी. मी ते पॅटिस अगदी पोटभर खातो. ते आवश्यक आहे. अरोरा मात्र फारसे खात नाही. त्याची तब्येत बरोबर दिसत नाही. रात्री झोप नीट लागली नाही असे तो म्हणतो. देसाई व प्रकाश ठीक आहेत; पण त्यांना लवकरच परतावे लागणार आहे, बर्फावर गेल्याबरोबर.


६॥ वाजता आम्ही निघतो. लोपसांग व दोरजे यांनी काल थोडा रस्ता पाहून ठेवला आहे. आम्ही त्यांच्या पाठोपाठ चालतो. आम्ही ताज्या पांढऱ्या शुभ्र बर्फावरून जातो. प्रत्येकाची बर्फावर सुंदर पावले उमटतात. बर्फ खुसखुशीत आहे. हवेत थंडी आहे. पण फारशी नाही. माझ्या अंगात वादळी कोटाखाली गरम म्हणजे फक्त N. C. C. ची जर्सी आहे. माझी जाड जर्सी व आतून घालावयाचे गरम गरम कपडे रकसॅकमधेच राहिले आहेत. मला थंडीचा चांगलाच सराव झाला आहे.

आम्हाला खडकाळ प्रदेश. ओलांडायचा आहे. मधून मधून बर्फाचे पट्टे लागतात. खडकांतून चालणे त्रासदायक वाटते. आम्ही शक्यतो बर्फातूनच चालतो. स्कॉटिश रीज आमच्या डाव्या बाजूला आहे.

थोडयाच वेळात लोपसांग व दोरजे यांनी ठरविलेल्या Camp 2 च्या जागेपाशी आम्ही येतो. मला वाटते ही जागा Camp 1 च्या फारच जवळ आहे. ह्या जागेवर आणखी एक कॅम्प करण्याचा त्रास होईल पण वेळ मात्र फारसा वाचणार नाही. " I think this is too close to camp 1. It would only mean the trouble of setting up another camp without any advantage of Camp 2." मी म्हटले, " Yes Sir, but we have no porters to take loads beyond this. We cannot give them proper equipment." लोपसांग म्हणाला. त्याचेही बरोबर आहे. आणखी जरा पुढे गेल्यावर विचार करू असे आम्ही ठरवितो.

आता आम्ही ती हिमनदी ओलांडली आहे. सुदैवाने आमच्या वाटेंत भेगा नव्हत्या. आता यापुढे सर्व बर्फच आहे.

Crampon बांधण्यासाठी आम्ही थांबतो. जवळजवळ ७॥ वाजले आहेत. आसपासच्या बर्फाच्छादित शिखरांवर सोनेरी सूर्यकिरण चमकत आहेत, पण आकाशात ढग आहेत. आज हवा कशी पडेल याची मला काळजी वाटते. पण आम्हाला जायलाच हवे.



क्रमांक १ च्या छावणीतून दिसणारा हिमालय

स्कॉटिश तुकडीच्या वाटेत आलेली खात्र जवळच आमच्या डाव्या बाजूला आहे. ते ज्या रीजवरून आले तिच्यात ३०० फूट कडा आहे. नंतर ती खडकांची रीज वरच्या पातळीवर बर्फाच्या शेवटच्या रीजला मिळते. त्या कड्यावर आल्यावर त्यांना काहीच करता येणे शक्य नव्हते. बाजूने खाली उतरण्याचा प्रश्नच नव्हता.

लोपसांगने माझ्या बुटाला Crampon व्यवस्थित बांधले. दोरजे व अरोरा एकमेकांना मदत करतात. देसाई व प्रकाश उभे राहून पहात आहेत. त्यांना यापुढे येता येणार नाही. मला ते खटकले. पण इलाज नव्हता.

आता निघायची वेळ झाली. "We will wonder around here and there and go back to the camp" प्रकाश म्हणाला. "Prakash Saab," लोपसांग त्याला सांगू लागला. तो सर्वांना साब म्हणतो. मी बडा साब. "Do not go far. Be careful on these snow slopes. When the other members come, set up the tents with the help of the porters. I have marked the positions" त्याने सर्व गोष्टींचा विचार करून ठेवला होता.

आम्ही पुढे निघतो. बर्फाचा वरचा पापुद्रा आमच्या पायाखाली पापडासारखा कुड्म कुड्म आवाज करीत मोडतो. "The snow conditions are good. Not too soft, not too hard' लोपसांग. आमच्या डाव्या


# इन्सिडेन्ट

लहान मुलांना दात सुलभ रीतीने येण्यास मदत करते.

ताप, जुलाब, सर्दी वगैरे कोणताही त्रास होत नाही.

प्रतिबंधक म्हणून चौथ्या महिन्यातच सुरू करा.

उत्पादक :

**न्यू इरा**
**होमिओपॅथिक फार्मसी**

दादर रेल्वे स्टेशनसमोर (पश्चिम) मुंबई – २८.

एजन्सी नसलेल्या गावी एजन्टस् नेमणे आहेत.

बाजूला त्या खडकाळ रीजचे टोक आहे. ते समोरच्या बर्फात जाऊन मिळते. त्यातले खडक मात्र ढिले वाटतात. एकाएकी एक लहानसा दगड निसटतो. आणि बर्फावरून घसरत आमच्या बाजूला येतो. तो अगदी लहान आहे. कोणाला लागता तरी फारसे लागले नसते. पण मी मात्र जरा दचकतो. आता आम्ही एका दोरात आहोत. पुढच्या टोकाला लोपसांग, नंतर मी, माझ्या पाठीमागे अरोरा व शेवटी दोरजे. गिर्यारोहणाच्या पद्धतीप्रमाणे आम्ही स्वत:ला दोरात बांधून घेतले आहे.
" Stop Stop " मागून अरोरा ओरडतो. आम्ही जेमतेम १०० यार्ड चाललो असू. त्याच्या एका बुटाचा Crampon ढिला झाला आहे. लोपसांग चिडतो. " ये क्या है " तो ओरडतो, " आप क्रॅम्पून ठीक लगा सकते नही." दोरजेच्या मदतीने अरोरा क्रॅम्पॉन पुन्हा नीट बांधतो.

आता आम्ही मानवाने आजपर्यंत पाऊल न टेकलेल्या प्रदेशात आहोत. माझ्या कल्पनेप्रमाणे आम्ही उजवीकडे जाऊन समोरच्या बर्फाच्या रीजवर चढू. त्या बाजूला Camp 2 कोठे ठोकता येईल याचादेखील मी विचार करीत होतो. पण लोपसांगने बरोबर विरुद्ध दिशेने वाट काढली. तो म्हणाला, " We will go to the left and climb over the cornice "

Cornice म्हणजे पर्वताच्या कडाकडांवर साचून बाहेर लोंबणारे बर्फ. काही वेळेला अनेक फूट कडांच्या बाहेर ते असते. त्याच्या वर चालणे धोक्याचे असते. कारण ते कधी कधी मोडते व चालणारा खाली कोसळतो. हिमप्रपातसुद्धा अशा ठिकाणी सुरू होतात.

आम्ही जरा बसतो. आमचा हा पहिलाच मुक्काम. उंची १७००० फुटांच्यावर असावी. आकाशात ढग आहेत. आता सूर्यप्रकाश नाही. आमच्या समोरच्या ऋषि-कोटच्या भिंतीवरून पलीकडे, आम्हाला नंदादेवीचे शिखर दिसू लागले आहे. आमच्या डाव्या बाजूला चांगभांग व ती जुळी शिखरे ढगात आहेत. हवा थंड आहे. आम्ही कॉफी पितो व सिगरेट ओढतो.

आता ती कॉर्निस अगदी जवळ आहे. पण बर्फाची उभी चढण आहे. एखाद्या भिंतीसारखी, पण आम्हाला कुऱ्हाडीने पायऱ्या खणाव्या लागत नाहीत. आमचे Crampons वरचा थर मोडून सहज आत घुसतात. खाली भुसभुशीत आहे. आता लोपसांग Cornice फोडून वर चढणार. " साब अच्छा बिलो रखना " तो म्हणतो. बिलो म्हणजे आपल्या पुढे (किंवा मागून) चढणारा गिर्यारोहक व आपण यामधील दोर व्यवस्थित धरून ठेवायचा. पाहिजे तेवढा सोडायचा. त्याच वेळेला आपला पाय घट्ट रोवून व कुऱ्हाड बर्फात खुपसून आपण घट्ट उभे रहायचे. चढणारा घसरलाच तर दोर हातातून निसटता कामा नये व त्याला खाली (म्हणजे आपल्या-सकट) न जाऊ दिले पाहिजे. तो कुऱ्हाडीचे घाव घालून कॉर्निस फोडतो व वर जायला रस्ता करतो. बर्फ इतस्तत: उडते. त्याचे सर्व कपडे बर्फाने भरून जातात.

अंगावरचे बर्फ झाडून व कुऱ्हाड पक्की रोवून तो उभा रहातो. "Come on Saab" तो म्हणतो. मी त्याच्याच मार्गाने वर जातो. मी वर चढून त्याच्या शेजारी उभा रहातो. नंतर अरोरा व दोरजे वर येतात.

आम्ही आता त्या शेवटल्या बर्फाच्छादित रीजवर उभे आहोत. ती स्कॉटिश खाच आता अधिकच भयंकर दिसते. सरळ ३०० फुटांचा कडा आहे. विरुद्ध बाजूला शिखराकडे जाणारी उभी चढण आहे. शिखर दिसत नाही.

आकाश ढगांनी भरलेले आहे. उघडीप होण्याची आशा नाही. निदान आहे त्यापेक्षा तरी हवा अधिक बिघडू नये अशी मी आशा करतो. पण ही फक्त आशाच. उभ्या चढणी शिवाय दुसऱ्या अडचणी आमच्यासमोर नाहीत. आम्ही चढू लागतो. हळूहळू उंची वाढते. वाढत्या उंचीचा आमच्यावर परिणाम होऊ लागतो. प्रत्येक पाऊल टाकताना कष्ट होतात. २५–३० पावलानंतर दम खाण्यासाठी थांबावे लागते. मी दोराला झटका देतो. "साब जरा ठैरो" मी लोपसांगला म्हणतो आणि आम्ही सर्व काही क्षण थांबतो. थोडा दम खाऊन पुढे चढू लागतो. आमच्या डाव्या बाजूचा उतार अगदी सरळ हनुमान व छोटा हनुमान ह्यांच्यामधील हिमनदीपर्यंत जाऊन पोहोचतो. त्या बाजूने वर चढणे जवळजवळ अशक्यच वाटते. छोटा हनुमान (१९२१०) आता अगदी स्पष्ट दिसतो. आमच्याच पातळीवर त्याचे शिखर असावे असे वाटते. पण आमच्यापेक्षा ते बरेच उंच आहे. त्याच्या उजव्या बाजूला तो प्रचंड दातासारखा खडकपण आम्ही ओळखतो. तो सुद्धा आता अगदी जवळ व स्पष्ट दिसतो. मी एक फोटो काढतो.

चढ आणखीच कठीण आहे. आमच्या पायाखाली भुसभुशीत बर्फाचा पातळ थर व त्याखाली खडकासारखे कठीण बर्फ आहे. "We will fix same rope now" लोपसांग सुचवितो.

आम्ही थांबतो. सर्व सामान लोपसांगजवळ आहे. तो बर्फात piton ठोकतो. हवा अजून सुधारत नाही. ऊन नाही. थोडासा वारा सुटला आहे. मधून मधून बर्फाचे पुंजके तरंगत खाली येतात. दोराचे एक टोक येथे बांधून झाले. "साब बिलो अच्छा रखना हं" लोपसांग मला म्हणतो व बांधलेला दोर हातात घेऊन पुढे चढू लागतो. मी, अरोरा व दोरजे तेथेच उभे रहातो. लोपसांग पुढे चढत आहे. त्याच्या मागे धुके व ढग. तो क्षणभर मागे वळून पहातो व प्रसन्नपणे हसतो. त्याचे दात सुंदर आहेत. आम्हाला तो हात करतो. फार सुंदर चित्र आहे. मला फोटो काढता येत नाही. कारण मी दोर हातात धरून उभा आहे.

आता दोराचे टोक लोपसांगच्या हातात आले. तो थांबतो. तेथे आणखी एक पिटॉन नंतर Carabiner आणि मग तो दोर बांधतो. आम्हाला वर येण्यास तो दोर बांधल्यावर चढण्यात धोका कमी आहे. बांधलेला दोर हातात धरून आम्ही वर चढू लागतो. एवढ्यात माझ्या कंबरेला बांधलेल्या दोराचा झटका बसतो व

मी थांबतो. अरोराचा तोल गेला आहे. मला वाटते हातात धरलेल्या दोरात त्याच बट अडकला. दोरजे त्याला मदत करतो व आम्ही लोपसांगजवळ जाऊन पोहोचतो.

आणखी एक दोर बांधावा लागणार. वाऱ्याचा वेग वाढला आहे. आसपासचे डोंगर जवळजवळ दिसेनासे झाले व थोडेथोडे बर्फ पण पडू लागले आहे. दुसरा दोर बांधून आम्ही कठीण बर्फाचा चढ ओलांडला आहे. आम्ही विश्रांतीसाठी बसलो. पावणे अकरा वाजले आहेत. ती स्कॉटीश खाच आता आम्हाला समोर आमच्याबरोबर खाली दिसते. शिखर दिसत नाही. पण ते जवळ असावे. आमची उंची १८५०० फूट तरी असावी.

माझ्या डोक्यात विचार येतो. आज आपण शिखर गाठणार. पण मला फोटो काढता येणार नाहीत. एवढ्यात अरोरा म्हणतो, " Let us try to reach the summit today. " " But we will not be able to take any photograph " मी म्हणतो. आणि लोपसांगला विचारतो, " Do you think the weather will clear ?" " I am doubtful. Let us continue for one hour and see " त्याने उत्तर दिले. दोरजे काहीच बोलत नाही. फक्त हसतो.

आम्ही निघतो. आता बर्फ भुसभुशीत आहे. आमचे पाय पोटऱ्यापर्यंत आत जातात. बर्फ बारीक साबुदाण्यासारखे आहे. चढ अगदी उभा आहे. मला आता उंची जाणवू लागली आहे. मी थकलेलो नाही. पण ५ – १० पावले टाकताच दम घेण्यासाठी थांबावे लागते. अरोराचे मात्र ठीक चाललेले दिसते. लोपसांग व माझ्या मधला दोर बराच लांब आहे. वर चढताना तो मागे वळून माझ्याकडे पहातो, हसतो व मला हात करतो. हवा मात्र बिघडत चालली. वाऱ्याचा जोर वाढला आहे. ढग आमच्या पातळीवर पण आहेत. काही वेळा मला लोपसांगची फक्त आकृती (Silowhette) दिसते.

१२ वाजून गेलेत. आम्ही विश्रांतीसाठी बसतो. आमची उंची १९००० फुटापेक्षा जास्त असली पाहिजे. " Now we must make it " अरोरा म्हणतो. तो फारच आग्रह धरतो. मी लोपसांगकडे वळतो. " I think we can make it sir " तो म्हणतो. " But what will our other members say ? " आम्ही फक्त दुसऱ्या कॅम्पसाठी जागा शोधायला निघालो होतो. " Don't worry saab. They won't say anything. They will be happy. I am with you " मी त्याला आश्वासन देतो. कोणीही न चढलेल्या शिखरांवरील मोहीमात हा प्रश्न नेहमीच येतो. प्रथम शिखर गाठण्यासाठी सदस्यांमध्ये स्पर्धा असते. कारण एक तर त्या शिखरावर प्रथम पोहोचण्याचा आनंद व दुसरे महत्त्वाचे म्हणजे वर्तमानपत्रातून मिळणारी प्रसिद्धी. पण आमच्या तुकडीबद्दल मला पूर्ण खात्री होती. मग भांडणाची गोष्टच सोडून द्या. आमची मोहीम यशस्वी व्हावी एवढीच आमची सर्वांची इच्छा होती. आणि आम्ही आज शिखर गाठण्याचा निर्णय घेतला.

(क्रमशः)

पुस्तके

## खुबीदार विनोदाचा मोहक आविष्कार

# हसरी गॅलरी

चित्रकार फडणीस यांची विनोदी मुखपृष्ठ – चित्रे आता महाराष्ट्रात रसिकमान्य झाली आहेत. गेल्या १५ – २० वर्षांत आपल्या वैशिष्टयपूर्ण शैलीच्या चित्रांनी त्यांनी मराठी मने काबीज केली आहेत. त्यांच्या काही निवडक चित्रांचे प्रदर्शन 'हसरी गॅलरी' या समर्पक नावाने मुंबई – पुणे आणि राजधानीतही भरले आणि त्याला रसिकांनी फारच चांगला प्रतिसाद दिला. मराठीच नव्हे तर इतर प्रांतीय मंडळींनीही ही चित्रे पाहून त्याचा आनंद लुटला आहे.

अशी चित्रे पुस्तकरूपाने प्रसिद्ध केल्यास त्याचेही स्वागत चांगले होईल या कल्पनेने व अनेक रसिकांच्या प्रत्यक्ष – अप्रत्यक्ष मागणीमुळे ही 'पुस्तकरूप गॅलरी' बाजारात आली आहे.

मुखपृष्ठावर व्यंगचित्रे छापणे ही कल्पना मराठी नियतकालिकांच्या क्षेत्रात अगदी नवीन आहे असे नाही. तथापि, आकर्षक स्वरूपामध्ये आणि मनोहर रंग-संगतीमध्ये ती देण्याची शैली श्री. फडणीस यांचीच ! व्यंगचित्रेही ओबड-धोबड व व सौंदर्यहीनच असायची हा काहीसा अकारण रूढ झालेला गैरसमज श्री. फडणीस यांनी साफ नाहीसा केला आहे. फडणिसांच्या चित्रातील नायक – नायिका 'व्यंग-चित्र' या साच्यातल्या वाटत नाहीत. ती विनोदी असली तरी मोहक असतात. चित्रातील विनोद मार्मिक आणि गालातल्या गालात हसविणारा असतो. आपल्या चित्रातील विनोदस्थळाकडे प्रेक्षकाचे लक्ष नेमके वेधून घेण्याची हातोटी चित्रकार फडणीस यांना चांगली जमली आहे. त्यांच्या चित्रांचे आणखी एक महत्त्वाचे अंग हे आहे की, त्यांच्या चित्राखाली मथळे देण्याची आवश्यकता नसते. (Cartoon without comment) त्यांचे चित्रविषय अशाच खुबीने निवडलेले आहेत.

या हसऱ्या गॅलरीत सुमारे ८० चित्रे व तशीच काही पूरक रेखाचित्रे मांडली आहेत. बहुतेक चित्रे 'तो' व 'ती' यांची आहेत. आपल्या रोजच्या व्यवहारातील, दैनंदिन आयुष्यातील काही मनोरंजक क्षण फडणिसांनी अचूक टिपले आहेत. पान सहावरील 'नमस्ते' हे चित्र, तसेच पहाटेच्या वेळी पेंगत रतीब घालणारा गवळी व

तो पेंगतच घेणारी नायिका, ऐन वरातीचे रंगाचा बेरंग करून टाकणारा पाऊस व फुलांच्या छत्रीतून येणारे पाणी अंगावर घेणारे असहाय्य जोडपे, रांगोळीच्या गालिच्यावर असलेल्या मद्राशाचे चित्र – ही चित्रे निर्भेळ आनंद देतात.

अनवधानामुळे घडलेले काही गमतीदार प्रसंगही चित्रकाराने कौशल्याने चित्रित केले आहेत. 'पुश '(ढकला) हे चित्र, तसेच साफसफाई 'मोहिमे 'मध्ये प्रथमोपचार पेटी पायावर पडल्याने 'तांडवा 'ची पोझ घेतलेला नायक, नायिकेच्या पदराने चष्मा पुसणारे बस स्टॉपवरील 'काका,' जलतरंगाच्या काचपात्रातील पाणी पिणारा तबलजी – अशी उदाहरणे बरीच देता येतील.

आपण रस्त्यातून हिंडत असताना, बागेत बसलो असताना, बाजारात जाताना अनेक वेळी काही मजेदार चित्रविषय दिसतात, त्यावरून काही चित्रकल्पना फडणीसांनी मार्मिकपणाने बसविल्या आहेत. पुतळ्याच्या हातातील झारीखाली बसून स्नान करणारे माळीबुवा, पुतळा धुताना पुतळ्याचे दातही ब्रशने साफ करणारी स्त्री, विमानाची तसबीर भिंतीवर ठोकताना, ती खाली पडते तेव्हा विमानातून पॅराशूट घेऊन उडी मारणारा वैमानिक, दुधाचे पातेले घेऊन गवळ्याजवळ आलेले मांजर, भांड्यांच्या बदली मिळालेल्या कोटाच्या खिशात घड्याळ सांपडल्यामुळे खुश झालेली बोहारीण व सौदा छान झाल्याने स्वतःशीच खुशाने हसणारी नायिका या व अशा चित्रांतून चित्रकाराची मिस्कील नजर दिसून येते.

याशिवाय पानपूरके म्हणून काही रेखाचित्रेही या पुस्तकात विखुरलेली आहेत. तीही चित्रे बोलकी आहेत. पुस्तकाचे शेवटी फडणिसांनी स्वतःचे रेखाचित्र (Self Portrait) छापले आहे. त्यातही कल्पकता आहे, खुबी आहे. हे पुस्तक चाळताना चित्रांची मांडणी अशा रीतीने केली आहे की ते कुठेही कंटाळवाणे होऊ नये.

या सर्व चित्रांचे विषय निवडताना व आशय व्यक्त करताना कुठेही हीन अभिरुची, भडकपणा अगर अतिरेकीपणा दिसत नाही. यात ठिकठिकाणी 'चिमटे ' आहेत. 'कोपरखळ्या ' आहेत 'टपल्या 'ही आहेत; पण त्यामुळे कुणी दुखावणार नाहीत. या गॅलरीत सर्व वयाचे रसिक निर्मळ विनोदाचा मनमुराद आस्वाद घेतील.

श्री. फडणिसांच्या चित्रातील रंग प्रसन्न व वातावरणास पोषक आहेत. रेषाही ठसठशीत आहेत, गतिमान आहेत. चित्रांची मांडणी सुबोध आहे. संग्रह पाहिल्यावर एक गोष्ट जाणवते. ही सर्वच चित्रे त्यांच्या मूळ चित्राप्रमाणे रंगीत असायला पाहिजे होती. परंतु छपाईचा खर्च व इतर मर्यादा आहेत. त्याही लक्षात घेणे भाग पडते. पुस्तक संग्राह्य आहे. प्रत्येक मराठी कुटुंबात अवश्य असावे असे....

– **वसंत सहस्रबुद्धे**

**[ 'हसरी गॅलरी ' ले. चित्रकार – शि. द. फडणीस, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे ३०. नागपूर १. मूल्य आठ रुपये. ]**



# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## ◻ दुपारच्या चिकनकरीची भ्रांत

आतापर्यंत मी तीस पैशांची एक प्लेट इडली घेतली की चांगले वाटीभर सांबार फुकट मिळायचे. पण आता त्याच वाटीला निराळे पाच पैसे पडायला लागल्यापासून महागाई प्रत्येकाला कशी जाचत आहे याचा मला नुकताच अनुभव आला होता. आता या महागाईचे आणखी एक करुण प्रत्यंतर आले आहे – परवा वर्तमानपत्रात वाचले की, इंग्लंडच्या एलिझाबेथ राणीला दरमहा सहा-सात लाख रुपयांचा तनखा पुरत नसल्याने हल्ली ती पैशाच्या चणचणीत असते, अशी चिंता-जनक माहिती तिचे यजमान फिलिप्स यांनी दिल्यापासून देशोदेशींच्या लोकांनी म्हणे तिला मनीऑर्डर्स पाठविल्या आहेत. गरीब बिचारी राणी ? मी पण तिला एक वेळच्या भाजीचे पैसे पाठविणार होतो – पण पूर्वी फुकट मिळणाऱ्या मनी-ऑर्डर फॉर्मला हल्ली पाच पैसे पडतात म्हणून जरा विचारात पडलो आहे.

तरी देखील एलिझाबेथ राणीवर कोसळलेले हे आर्थिक संकट टाळण्यासाठी मी काही उपाय सुचवू इच्छितो. पहिला उपाय म्हणजे पैसा-फंड गोळा करणे. (या बाबतीत लागणारे टेक्निकल नो-हाऊ इंग्लंडात उपलब्ध नसेल तर सदोबा पाटलांना बोलावून घ्यावे.) दुसरा उपाय म्हणजे बकिंगहॅम पॅलेसमध्ये पोटभाडेकरू घेणे. आणखी एक जरा जालीम उपाय आहे. मागे म्हणे हॉलंडच्या राणीनेही अशीच पैशाच्या चणचणीची तक्रार केली होती. तेव्हा दुपारच्या चिकनकरीची भ्रांत पडलेल्या इतर अशाच राजेराण्यांना गोळा करून त्यांचे एक ट्रेडयुनियन स्थापन करणे व महागाई भत्ता वाढण्यासाठी संपावर जाणे. हे उपाय थकले तर मात्र बिचाऱ्या एलिझाबेथ राणीवर आपल्या मुकुटातला कोहिनूर हिरा अन् असेच किडूक मिडूक मोडून खाण्याचा प्रसंग यायचा.

## ◻ सरकारमान्य पोरखेळ

कुठल्याशा पाश्चिमात्य देशातल्या सरकारने प्राथमिक व माध्यमिक शाळांचे संचालन करण्याच्या कामी विद्यार्थ्यांना किती अधिकार असावा हे ठरविण्यासाठी

एक समिती नेमली आहे. तिच्यात म्हणे दहा-बारा वर्षांच्या एका मुलाला व मुलीला सल्लागार म्हणून घेण्यात आले आहे. छान ! सरकारी सल्लागार समित्या म्हणज बहुधा पोरखेळ असतो असे म्हणतात खरे; पण तो पोरखेळ असा सरकार-मान्य होईल अशी कल्पना नव्हती. या सल्लागार समितीचा अहवाल जेव्हा तयार होईल तेव्हा ही सरकारी पोरे त्याला स्वत:ची वेगळी पुस्ती जोडतील यात शंका नाही. आमच्या छोटयाच्या मते या पुस्तीतले मुख्य मुद्दे असे :

प्राथमिकच काय पण कुठल्याही शाळेची कटकट असावीच काय हा प्राथमिक मुद्दा आहे. अज्ञानात आनंद असतो असे सुप्रसिद्ध वचन आहे, तेव्हा मोठी माणसे आम्हा लहान मुलांना या आनंदापासून का वंचित ठेवू इच्छितात याची कसून तपासणी झाली पाहिजे. हल्ली असा वैज्ञानिक शोध लागला आहे की, कुठलाही विषय झोपेत चांगला शिकता येतो. तेव्हा आम्ही मागच्या बाकावर बसून डुलक्या घेतो तेव्हा खरे म्हणजे अभ्यासात गढलेले असतो हे शास्त्रीय सत्य शिक्षकांनी विसरता कामा नये.

हिंदुस्थानातले सुप्रसिद्ध जादूगार सरकार यांनी शिक्षणक्रमात जादूचा अंतर्भाव करण्याची सूचना केली आहे. तिचा प्रत्येक सरकारने नीट विचार करावा. या जादूई अभ्यासक्रमात काय विषय ठेवता येतील याची प्रमुख उदाहरणे : मोहनिद्रा : विद्यार्थ्याला वर्गात निद्रा लागलेली पाहून त्याला पहिला नंबर देण्याचा शिक्षकाला मोह पाडण्याचे इंगीत. दिव्यदृष्टी : पेपर लिहिताना बाकाखाली दडवलेले पुस्तक न उघडता वाचता येण्याची शक्ती. अदृश्यता : विद्यार्थ्यांनी अभ्यास केला पाहिजे असा जुलमी हट्ट करणाऱ्या शिक्षकावर छूमंतर करून त्याला नाहीसा करण्याची कला.

## ◘ ईश्वराने जिंकलेली निवडणूक

पूर्वीचे लोक ईश्वर आहे की नाही याचे उत्तर साधुसंतांना विचारून ठरवित. पण हल्लीच्या लोकशाही जमान्यात आपल्या लोकसभेत परवा या प्रश्नावर मतदान होऊन ईश्वर आहे असे बहुमताने ठरले. काँग्रेच्युलेशन्स, देवा ! तुमचा अगदी निवडणुकीत विजय झाला म्हणा ना ! कृष्णावतारी तुम्ही दोन-दोन गणराज्यांचे प्रेसिडेंट होतात म्हणे, पण त्या काळी तुमच्या पंतप्रधानाला सदसद्विवेकबुद्धीची दुर्बुद्धी आठवली नाही हे तुमचे नशीब, नाहीतर त्या वेळीही तुम्हाला निवडणुकीचा हिसका दिसला असता. सांगायचा मुद्दा काय, भगवंता यापुढे तुम्ही अल्पसंख्यांक साधु-संतांना गुपचूप दर्शन देत जाऊ नका, चांगले जाहीरपणे 'मी उभा आहे' अशी घोषणा करा अन् बहुसंख्य मतदारांच्या पक्षाला पावत जा. परमेश्वर असला तरी तो पाचामुखी पाहिजे. जनार्दन असला तरी त्याला जनता – जनार्दनाचा कौल पाहिजे.



रंगभूमी

# अशी बायको हवी

बंदीस्त प्रयोग. सर्वसाधारण प्रेक्षकाला रुचेल-पचेल असा नाट्यविषय. उत्तम नटसंच आणि उत्कृष्ट निर्मिती यांची सांगड घालून अत्रे थिएटर्स या संस्थेने व्यवसायिक यशाची वाटचाल केली आहे. आपल्या या परंपरेला साजेशा पद्धतीने संस्थेने आचार्य अत्रे यांचे बहुधा अखेरचे नाटक-बहुधा अशासाठी की अखेरचे असा अधिकृत उल्लेख कोठेही झालेला नाही-' अशी बायको हवी ' श्री. आत्माराम भेंडे यांच्या दिग्दर्शनाखाली रंगभूमीवर आणले आहे.

या नाटकाला कथानक फारच थोडे-इतके की, नाटकामध्ये संगीत-नृत्य आहे ते कथानकाच्या गरजेपेक्षा कथावस्तूची लांबी वाढवण्याच्या हेतूने नाटकाला जोडले असावे असे वाटते.

आदर्श पत्नीच्या भंकस कल्पना बाळगणाऱ्या अण्णा इनामदारांनी जानकी नावाच्या मुलीला स्वतःची पत्नी करण्याच्या हेतूने आणलेले असते. पत्नी संबंधीच्या आदर्श कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी इनामदार जानकीला जनसंपर्कापासून दूर फक्कडशा बंगल्यात बंदिस्त करून ठेवतात. अण्णांच्या दोस्ताचा मुलगा रघू येतो. आणि योगायोगाने जानकीच्या प्रेमात पडतो. रघूपासून जानकीला दूर ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करूनही अखेर जानकी-रघूचे मीलन होते. जानकीला एकटी ठेवून तिची अभिलाषा बाळगणारा इनामदार म्हणजेच आपले अण्णा याचा रघूला अखेरपर्यंत पत्ता लागत नाही.

या कथानकावर आचार्य अत्रे यांनी पूर्वी ' चोरावर मोर ' नावाचा चित्रपट काढला होता, आणि हाच विषय त्यांनी आपल्या अखेरच्या नाटकासाठी निवडला. लेखनाची एकंदर जडण-घडण पाहिली म्हणजे आचार्यांना या नाटकावरून अखेरचा हात फिरवण्याची संधी मिळाली नसावी असे वाटते.

तथापि जे हाताशी आले त्याला जास्तीत जास्त न्याय देण्याचा प्रयत्न दिग्दर्शक आत्माराम भेंडे यांनी केला आहे. प्रयोग जो काही थोडाफार रंगतो त्यामध्ये आत्माराम भेंडे यांचा वाटा फार मोठा आहे. नाटकाला फार्सीकल ट्रीटमेन्ट देऊन त्यांनी प्रयोग खुलवण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न केले आहेत. बाबा वैशंपायन आणि मीना

सुखटणकर या दोन्ही कलावंतांनी त्यांना उत्तम साथ दिली आहे. श्री. भेंडे यांना अभिप्रेत असलेली 'क्रेन' त्यांनी बरोबर पकडली आहे. उदय गोडबोले अजनही फार 'आर्टीफीशिअल्' वाटतात. विशेषतः सुखटणकर-वैशंपायन यांची पातळी पकडता न आल्याने ते एकटे पडतात. गद्यातील उणीव ते संगीतात भरून काढतात एवढेच. अर्थाला आणि रचनेला अतिशय सामान्य असलेली सोपानदेव चौधरी आणि श्रीकृष्ण साक्रीकर यांची गीते उदयराजांच्या आवाजाने, आणि डावजेकरांच्या चालीने श्रवणीय वाटतात.

नाटकाच्या यशातील दुसरे मोठे वाटेकरी नेपथ्यकार रघुवीर तळाशीलकर. स्थलकालातील अपेक्षित बदल बरोबर सुचवून फार्सची गती संभाळणारे त्यांचे नेपथ्य प्रयोगाची रंगत वाढवते. अण्णांनी कोंडून ठेवलेल्या जानकीच्या बंगल्याच्या दारातून कोंडलेल्या मैनेची अवस्थाही त्यांनी सूचकतेने प्रगट केली आहे. अण्णांचे घर असो बगीचा असो, अथवा जानकीचे घर असो—पात्रांना आणि प्रेक्षकांना क्षणार्धात घटनास्थळी घेऊन जाण्याचे त्यांचे कौशल्य मोठे बहारदार वाटले. आणि विशेष म्हणजे हा बदलही फारशी तांत्रिक गुंतागुन न ठेवता अतिशय सुलभतेने घडवून आणण्यात ते यशस्वी झाल्याने प्रेक्षकांचे लक्षही प्रयोगावरून विचलीत होत नाही. छोट्या भूमिकेमध्ये दिनेश करमरकर, ललिता कारेकर आदि कलावंत ठाकठीक वाटतात.

चार घटकांची करमणूक करण्याखेरीज नाट्यलेखनामागे विशेष काही हेतू नाही. तथापि विषयाचा आवाका अपुरा असल्याने प्रयोग काही वेळा—विशेषतः दुसऱ्या अंकात कंटाळवाणा वाटतो. नाटकात घटना अशा नाहीतच. त्यात पुढे काय होणार याची प्रेक्षकांना कल्पना आल्याने प्रेक्षकांची प्रयोगातील गोडी कमी होते. ज्योतिषांचा प्रवेश अनावश्यक व ओढून ताणून आणला असला तरी निर्जीव होऊ पहाणाऱ्या प्रयोगात त्यामुळे काही काळ चैतन्य निर्माण होते. अपुऱ्या कथानकाला संगीताचा आणि नृत्याचा साज चढवून प्रेक्षकांसमोर आणल्याने, आणि आत्माराम भेंडे आणि तळाशीलकरांसारख्या पडद्यामागील कलावंतांनी नाटकाचे रंगरूप हेरून अचूक कामगिरी केल्याने प्रयोग रंगतो.

उत्तम कलावंत आणि तंत्रज्ञ यांचा एकसूर लागला, तर बेताच्या नाटकाची मैफलही बऱ्यापैकी रंगते याचे उदाहरण म्हणून 'अशी बायको हवी' या नाटकाचा उल्लेख करावा लागेल.

— प्रतिनिधी

चित्रपट

## माने परंपरेतील दोन चित्रे

# गणगौळण

आणि

# मैना

या कलाकारासंबंधी किंवा त्याच्या चित्रपटासंबंधी कोणाची काहीही मते असोत, मराठी चित्रपट एकामागून एक धडाधड कोसळत असताना साठ आठवडे, सत्तर आठवडे सहज चालणारे चित्रपट फक्त हाच कलावंत-श्री. अनंत माने देऊ शकत आहे.

आल्हादच्या बॅनरखाली केलेले काही निवडक चित्रपट, आणि नंतरच्या काळातील मानिनीसारखा एखाद दुसरा अपवाद वगळता श्री. माने यांचे सर्व चित्रपट ग्रामीण जीवनावर आधारीत व तमाशाच्या फडाभोवती फिरताना दिसतात. सांगत्ये ऐका, केला इशारा जाता जाता, एक गाव बारा भानगडी, आणि आता गणगौळण, आणि डोंगरची मैना हे नवीन चित्रपट याची साक्ष पटवतात. हे किंवा त्यांचे अनेक ग्रामीण चित्रपट पाहिले तर सर्वसाधारणपणे विषय, व्यक्तिरेखा, संवाद, नृत्यपद्धती, या सर्व बाबतीत विलक्षण साम्य तर आढळते; पण त्यांच्या चित्रपटाचे कलाकार, अगदी दुय्यम भूमिका करणारेसुद्धा जवळजवळ तेच असतात. पडद्या मागील तंत्रज्ञ मंडळींचाही तोच संच कायम असतो. स्वाभाविकपणे त्यांचे चित्रपट अनेक असले तरी त्या सर्वांमधून एक लयबद्ध पुनरुक्ती सातत्याने पहावयास मिळते. मात्र असे असले तरी श्री. माने आपल्या चित्रपटाची भट्टी अशी काही जमवतात, की त्यांचा ठरलेला प्रेक्षक चित्रपट पुन्हा पुन्हा ते सर्व पहातो. आठवड्यामागून आठवडे फुगत जातात. गर्दी होत रहाते. माने यांचा नवीन चित्रपटही तयार झालेला असतो; तथापि आधीचा चित्रपट चालू असल्याने थिएटर मिळणे मुश्कील होऊन जाते. असे हे अपूर्व यश श्री. माने गेली अनेक वर्षे मिळवत आहेत.


त्यांच्या या यशस्वी परंपरेतील त्यांच्या नेहमीच्या वळणाने जाणारे नवीन चित्र गणगौळण. माने-नमाडे जोडी फुटल्यानंतर श्री. माने यांनी स्वतंत्रपणे तयार केलेला आणि चंद्रविलास-फिल्मस् या आपल्या मुलांच्या वितरण संस्थेमार्फत प्रदर्शित केलेला हा चित्रपट एका शाहीराची कथा सांगतो.

गुणवंतराव जेजुरीकर हा या चित्रपटाचा नायक. त्याचे वडील नामवंत शाहीर

असतात. या शाहिरीच्या शौकापायी तमाशाच्या नादी लागून त्यांनी संसाराची धुळधाण केलेली असते. ससाराची झालेली ही परवड त्यांच्या मोठ्या मुलाने बघितलेली असते. आपल्या भावाचा कवने करावयाचा शौक त्याला मानवत नाही. योगायोगाने गुणवंताची व चंद्रावळीची गाठ पडते घरचा विरोध पत्करून गुणवंत शाहीर म्हणून चंद्रावळीच्या फडाबरोबर हिंडू लागतो. गुणवंताच्या वडिलांचा खून चंद्रावळीच्या वडिलांनी केलेला असतो. या घटनेभोवती रहस्य गुंफून त्याची हळुवार उकल करण्यात आली आहे. अर्थात रहस्यभेद करून प्रेक्षकांची उत्सुकता कमी करण्याचे प्रयोजन नाही.

शाहीर गुणवंता आणि तमासगिरीण चंद्रावळ यांच्या कथेमध्ये स्वाभाविकपणे नृत्य–लावण्या यांना प्राधान्य मिळणारच. चित्रपटाचा बराच मोठा भाग या नृत्य–लावण्यांनी व्यापलेला आहे. कथा जरी फारशी जोरकस नसली तरी मांडणी जास्तीत जास्त तर्कशुद्ध व आकर्षक करण्याचा प्रयत्न दिग्दर्शक श्री. अनंत माने यांनी केला आहे. कथा फारशी प्रवाही न राहिल्याने चित्रपटाचा पूर्वार्ध काहीसा रेंगाळलेला वाटतो. अर्थात सवालजबाव, लावण्या आणि नृत्ये यांची बरसात श्री. माने यांच्या खास प्रेक्षकाला निश्चितपणे आनंद देऊन जाईल. अशा पद्धतीच्या चित्रपटातून अनेक वेळा भूमिका करून सरावलेली जयश्री गडकर, अरुण सरनाईक यांची जोडी प्रमुख भूमिकातून अभिनयाची बाजू समाधानकारक पद्धतीने संभाळते. गणपत पाटील, निळू फुले, बबन काळे, आणि अन्य दुय्यम भूमिकांतून चमकलेले कलावंत एरवी रंगभूमीवर तमाशातून वावरत असल्याने, त्यांच्या अभिनयात सहजता आली आहे. तांत्रिक बाबींपैकी ध्वनि–लेखन अतिशय त्रासदायक आहे. पार्श्वसंगीतही कित्येक ठिकाणी अकारण कर्कश्श करून ठेवले आहे. जगदीश खेबूडकर यांच्या गीतांतील सोपेपणा जाणवण्यासारखा आहे. साधे सोपे शब्द वापरून त्यांनी रंगतदार लावण्या लिहिल्या आहेत. वानगीदाखल–'ही ढंगदार मदमस्त नार, फिरवी कशी नजरेचा–भवरा,–अहो हिच्यासाठी जीव झाला बावरा.' या कवनाचा उल्लेख करतो त्यांनी लिहिलेले सवाल–जबाबही आकर्षक आहेत. बहुतेक सवालांची उकल समाधानकारक आहे. संगीत दिग्दर्शक राम कदम रुळलेल्या वाटेने गेले असले, तरी सवाल–जबाबातील चालींमध्ये त्यांनी भरलेला वेगळेपणा जाणवण्यासारखा आहे.

मराठी चित्रपटांमध्ये सर्वत्र आढळून, येणारा दोष म्हणजे कॅमेरा वापराचा. कृत्रिम स्टेजी कांपोझीशन्स, आणि ठराविक कॅमेरा अगल्सचा वापर. हा दोष याही चित्रपटामध्ये आहे; तथापि चित्रपटाचा विषय तमाशाप्रधान असल्याने सामाजिक चित्रपटांच्या बाबतीत हा दोष जितक्या प्रकर्षाने जाणवतो तितका तो या चित्रपटामध्ये जाणवत नाही इतकेच. खास माने परंपरेतील आणखी एक बोलपट-म्हणून 'गणगौळण' लक्षात राहील.



। अरुण सरनाईक । जयश्री गडकर । डोंगरची मैना ।

# डोंगरची मैना

दिग्दर्शक अनंत मानेच, तंत्रज्ञ आणि कलाकारही हेच. वातावरण तेच असले, तरी विषय वेगळा असल्याने पुण्याच्या विलास चित्र या संस्थेचा ' डोंगरची मैना ' हा चित्रपट अनेक दृष्टीने वेगळा वाटतो. डोंबारी, गारुडी, दरवेशी या भटक्या जमाती गावोगाव हिंडून पोटापुरते मिळवत असतात. अशाच भटक्या लोकांच्या पाली एका गावात पाटलाच्या माळावर पडतात. बाळू डोंबारी, सखा माकडवाला, अस्वल नाचवणारा दरवेशी, ही मंडळी व्यंकाचे मित्र. व्यंकाची मुलगी मैना आणि सखारामचा मुलगा येमू यांचा एकमेकांवर जीव जडतो. पाटलाचा मुलगा रंगराव पक्का दारूबाज, आणि छदीफंदी असतो. नवीन पाखराची चाहूल घेत पालीमध्ये हिंडत असताना अकल्पितपणे मैना त्याच्या समोर येते.–येमू–रंगराव–मैना नेहमीचा संघर्ष, भट्टी लावणाऱ्या पाऱ्याच्या दुष्ट कारवाया, खून-रहस्य-गुंतागुंत-पाटलाच्या हातून स्वत:च्या


मुलाचा खून आणि मैना-प्रेमूचे मीलन. अशा घटनांतून गुंफलेली ही कथा लक्षात राहते ती कथेच्या वास्तव हाताळणीमुळे. भटक्या जमातींच्या पालींमधून आढळणारे वातावरण, दारिद्र्य, हेवेदावे, हातभट्टी प्रकरण, मारामाऱ्या, आणि प्रसंगी दिसणारी माणुसकी याचे अचूक टिपण अनंत माने यांनी केले आहे. बाह्य चित्रण आणि स्टुडीओतील चित्रण यांचे मॅचींग समाधानकारक आहे. स्टुडीओतील देखाव्यातून वास्तववादी वातावरण निर्माण करण्यात कलादिग्दर्शक श्री. सदाशिव गायकवाड यशस्वी झाले आहेत.

महंमदसाहेबांचे छायाचित्रण त्यांच्या पूर्व लौकिकाला साजेसे नसले, तरी फारसे दोषास्पद नाही. काही शॉटस्‌साठी वापरलेले लाइटींग कल्पकतापूर्ण वाटते. मात्र काही शॉटस् फॉगी आहेत. सर्वसाधारण चित्रपटनिर्मितीला जितका काल लागतो त्या कालात चित्रपट पूर्ण न होता, तो रेंगाळला असावा असे प्रिंटची एकंदर अवस्था पाहून वाटते.

विशेषत: दुय्यम कलाकारांची निवड पुष्कळ चोखंदळपणे केली आहे. जयशंकर दानवे पाऱ्याच्या इरसाल भूमिकेमध्ये त्यांच्या खास ढंगाने वेगळाच रंग भरतात. त्यांच्या अभिनयात कृत्रिमपणा असला, तरी निदान या चित्रपटापुरता तरी तो उपकारक वाटतो. गणगौळण आणि डोंगरची मैना यांची तशी तुलना होऊ शकणार नाही. तथापि दिग्दर्शक या नात्याने श्री. अनंत माने यांनी डोंगरची मैना अधिक काळजीपूर्वक हाताळली आहे. पालीतील वातावरण त्यातील जिवंतपणासह त्यांनी अचूकपणे टिपले आहे. अस्वल आणि माकडे यांच्या खेळांचे टेकींग अधिक कल्पकतेने घेणे आवश्यक होते. खेळ करणारा व माकड-अस्वल यांचा एकही कांपोझीट शॉट नसावा ही गोष्ट खटकते. विशेषत त्यामुळे त्यातील खोटेपणा ठळकपणे पुढे येतो. खेबुडकर-कदम जोडीने अनुक्रमे गीतरचनेची व संगीताची बाजू ठाकठीकपणे संभाळली आहे. 'तांडा चालला रे गड्या तांडा चालला' हे थीमसाँग सर्वदृष्टीने-अर्थ, चाल, टेकींग-समाधान देऊन जाते. पोलीसखाते नावाची चीज अस्तित्वात आहे का नाही असा संभ्रम निर्माण करणारा प्रश्न मनात वारंवार निर्माण होतो. त्याकडे दुलक्ष करून चित्रपट पाहिल्यास चित्रपट समाधान देऊन जातो.

ग्रामीण जिवनाची विविध अंगे-अचुकपणे टिपणारा चित्रपट शहरी प्रेक्षकांनी अवश्य पहावा असे सुचवावेसे वाटते.

—शरद गोखले



# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

३ ते ९ जानेवारी १९७०

**मेष** : राशीत उदरी शनी आहे. त्याच्या समोर गुरू आहे गुरूच्या दृष्टीमुळे साडेसातीचा त्रास कमी होईल. नोकरीधदा चांगला चालेल. विशेषतः फॅन्सी वस्तूंचा व्यापार असलेल्यांना अतोनात फायदा होईल. पत्नीकडून लाभ होण्यात मदत होईल. अविवाहितांचे विवाह जमण्याचा योग आहे. विशेषतः मुली प्रेमाच्या फंदात सापडण्याचा संभव आहे. सार्वजनिक कामे यशस्वी होतील. कौटुंबिक बाबतीत जरा त्रास होईल. ता. ४–५ यादृष्टीने त्रासदायक जातील. ता. ६ ते ९ हे दिवस चांगले आहेत. अपेक्षित पत्रव्यवहार होईल. नोकरीसाठी प्रयत्न करण्याला दिवस चांगले आहेत. च, ल आणि अ या आद्याक्षरांनी सुरू होणाऱ्या नावाच्या मुलामुलींची प्रेम-प्रकरणे होण्याचे योग आहेत.

**वृषभ** : साडेसाती. बारावा शनी त्रासदायक आहे. शत्रूकडून त्रास होईल. धन मिळण्यात अडथळे उत्पन्न होतील. चंद्राचे भ्रमण ६।७।८ या घरातून आहे. त्याचे फळ—पहिल्या दोन दिवसात (ता. ३।४) धनलाभ होईल. दशमातील राहू –मंगळ सार्वजनिक कामात यश देतोल. अष्टमातील रवि-शुक्र सुख नष्ट करतील. भागीदाराकडून व पत्नीकडून त्रास होईल. २७ ते ३२ वयाच्या दरम्यान असलेले तरुण प्रेम-प्रकरणात सापडतील. काहीचे विवाह जमतील. प्रमोशन अगर मानमरातब मिळण्याच्या योग आहे. विशेषकरून व, ब या आद्याक्षरांनी सुरू होणाऱ्या नावाच्या लोकांना विवाहाचे योग येतील. साडेसातीचा त्रास कमी होण्याकरिता रविवारचे उपवास करावे.

**मिथुन** : शनी अष्टमेश भाग्येश अकरावा आहे. अचानक धनलाभ होईल. पंचमात गुरू व भाग्यात शनी-मंगळ. ह्यातून शास्त्रीय लिखाण होईल ८।९ तारखांना धनलाभ होईल. लॉटरीत फायदा होईल. ता. ६।७ प्रवासयोग येईल. प्रवासात त्रास होईल. शक्य तर प्रवास लांबणीवर टाकावा. मिथुन राशीची माणसे अत्यंत खोल मनाची असतात. घरात सासुरवाडीची किंवा मामांकडची माणसे पाहुणे येतील. यांत्रिक व्यवसायातील लोकांना फारच चांगले दिवस आहेत. कंत्राटदारांना सरकारी कामे मिळण्याचा योग आहे. बुध अष्टमात गेल्यामुळे सुख नाहीसे होईल. अशीच

फळे क, प, घ या आद्याक्षरांनी सुरू होणाऱ्या लोकांनाही मिळतील. विद्यार्थ्यांना परीक्षेत भरघोस यश येईल. फक्त एकच त्रासदायक ग्रह आहे. तो म्हणजे शुक्र अष्टमात आहे. त्याकरिता गजांतलक्ष्मीच्या चित्राचे दर्शन घ्यावे.

**कर्क** : दहावा शनी. इभ्रतीला धोका बसतो की काय अशी स्थिती निर्माण होईल. पण चतुर्थातील गुरू त्यापासून संरक्षण करील. सहावा रवि-बुध अडचणीतून बाहेर काढतील. वडील माणसे—विशेषतः पिताजी वृद्ध असल्यास त्यांना आजारी-पण येण्याची शक्यता आहे. गुरुवार—शुक्रवारी येणे असलेले पैसे अचानक हातात येतील. अष्टमातील राहू-मंगळ खर्चाचे प्रमाण वाढवितील. विशेषतः मुलांच्या आजारपणाकरिता खस्ता खाव्या लागतील. घरात पत्नीकडून साह्याय्य होईल. ज्यांची नावे ह अगर ड या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही अशीच फळे मिळतील. या आठवड्यात झालेले व्यवहार यशस्वी होतील. यश मिळण्याकरिता दररोज शंकराचे दर्शन घ्यावे.

**सिंह** : नववा शनी आहे. तो षष्ठेश व सप्तमेश आहे. धर्मवृत्ती नाहीशी होईल. ता. ३ अगर ४ ला प्रवासाचा बेत होईल. त्यात चांगला फायदा होईल. सरकारी अगर सहकारी कामाकरिता प्रवास होईल. त्या कामात यश येईल. नोकरी असणाऱ्यांना बढती निश्चित मिळेल. कदाचित नोकरीत बदली संभवते. पत्नीशी व भागीदारांशी मतभेद होतील. गुरूची दृष्टी त्या स्थानावर असल्यामुळे ते विकोपाला जाणार नाहीत. सिंहराशीला अगर लग्नाला आधीच वैवाहिक सुख कमी असते. त्यात राहू-मंगळ सप्तमात आहेत. ते वाईट आहेत. प्रेमविवाह झालेला असेल तर फारच त्रास होईल. म आणि ट या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू असतील त्यांनाही वरील प्रमाणे फळे मिळतील.

**कन्या** : शनी आठवा आहे. मुलांशी मतभेद होतील. अभ्यासात व्यत्यय गुरू त्यावर पाहतो आहे व तो दुसरा आहे. त्यामुळे मतभेद विकोपाला जाणार नाहीत. ता. ३।४ ला धनलाभ चांगला होईल. लॉटरीत अचानक धनलाभ भरपूर होईल. सरकारी नोकरांना घरबसल्या फायदा होईल. शत्रु निर्माण झाले तरी त्यांचा नाश निश्चित होईल. भावंडांकडून त्रास होण्याचा योग आहे. घरात काहीतरी नव्या वस्तू खरेदी केल्या जातील. कन्या राशीची माणसे दुटप्पी असतात. विशेषतः सरकारी नोकरीतील लोक कोणाचे काहीही काम न करताना सर्वांना खुश करून परत धाडतात. त्यांना कोणीच वाईट म्हणत नाहीत. प, भ आणि द या अक्षरांनी सुरुवात असलेल्या नावांच्या माणसांनाही याप्रमाणेच फळ मिळेल.

**तूळ** : शनी सातवा आहे. पत्नीशी मतभेद होईल. भागीदारीत त्रास होईल. गुरुकृपेमुळे या अडचणी निवारण होतील. विद्याभ्यासाकडे विद्यार्थ्यांचे दुर्लक्ष होईल. घरात चैनीच्या वस्तूंची खरेदी होईल. भोळेपणामुळे फसवणूक होईल. ता. ८–९

ला प्रवासाचा योग येईल. प्रवासामुळे फायदा होईल. यंत्रसामग्रीच्या धंद्यातील लोकांना दिवस चांगले जातील. छापखानेवाल्यांना आठवडा प्रगतीपर आहे. नवे नवे उद्योग – प्रकाशने घ्यावी. पत्नीशी कडाक्याचे भांडण होण्याचा योग आहे. तरुणतरुणी प्रेमाच्या जाळ्यात सापडण्याचा योग आहे. सार्वजनिक कामात यश मिळेल. ज्यांच्या नावांची आद्याक्षरे र आणि त असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील.

वृश्चिक : शनी सहावा आहे. या राशीची माणसे भलतीच महत्त्वाकांक्षी असतात. शनी षष्ठेश तृतीयेश सहाव्या घरात आहे. तो शत्रूंचा नाश करील. चतुर्थातील मंगळ – राहू सुख नष्ट करतील, पण सार्वजनिक कामात भरपूर यश देतील. धन-नाश होईल. पण या सर्वातून सहीसलामत बाहेर पडून सार्वजनिक कामात, विशेषतः राजकारणात यशप्राप्ती होईल. प्रेमप्रकरणातून भांडणे होण्याचा योग आहे. या राशीची माणसे अत्यंत व्यवहारी असतात. त्यांना अध्यात्माचा गंधही नसतो. ते स्वार्थापलीकडे काही पहात नाहीत. त्यांचे सर्व व्यवहार शेवटी स्वतःच्या नातलगां-पुरतेच असतात. य आणि न या अक्षरांनी सुरू होणाऱ्या लोकांनाही वरीलप्रमाणेच फळ मिळेल.

धन : शनी पाचवा आहे. मंगळ – राहू तिसरे व रवि – बुध पहिले. गुरू अकरावा. सर्व ग्रह मदतीला हजर आहेत. सर्व कामात यश प्राप्त होईल. सरकारी कामात यश मिळेल. धनलाभ मनाप्रमाणे होईल. नवीन मित्र भेटून अनेक कामे मार्गाला लावतील. या राशीची माणसे महत्त्वाकांक्षी असतात. त्यांना समाजात नेहमी उच्च स्थान हवे असते. ते त्यांना मिळेल. या आठवड्यात त्यांच्या आशा – आकांक्षा पूर्ण होण्याच्या मार्गावर येतील. शुक्र मकरेत आहे. तो एकादशेश व षष्ठेश आहे. तो धनस्थानात आला आहे. कलावंतांना पैसा मिळविण्याचे योग आहेत. विशेषतः गायक व चित्रकार यांचा गौरव होईल. य, भ, फ आणि ढ या अक्षरांनी ज्यांची नावे सुरू आहेत त्यांनाही वरीलप्रमाणेच फळ मिळेल.

मकर : शनी चौथा. राहू – मंगळ दुसरे. गुरू दहावा. पैकी दहावा गुरूच काय तो परिस्थिती आटोक्यात आणील. अगदी जाते अशी वाटणारी व्यापारातील पत गुरू सावरून धरील. मात्र चंद्राचे भ्रमण १० – ११ या घरातून आहे, ते चांगले आहे. ता. ३ ते ६ हे दिवस त्यातल्यात्यात बरे जातील. लग्नात शुक्र आहे. तो दशमेश व पंचमेश आहे. मुलांकडून व वडील भावंडांकडून आयत्या वेळी मदत होईल. कोर्टकचेरीची कामे पुढे टाकावी. सुख – धन – मानसन्मान यात धांदल उडेल. करायला जाल त्यात अपयश येईल. दररोज २१ गायत्री जप करावा. ज, स, ख, ग, श या आद्याक्षरांनी सुरू होणाऱ्या नामधारकांनाही वरील फळ मिळेल.

कुंभ : शनी तिसरा. मंगळ – राहू लग्नात. रवि – शुक्र अकरावे. सर्व ग्रह अत्यंत चांगले आहेत. गुरू भाग्यात आहे. तो अकरावा दुसऱ्या घराचा अधिपती

आहे. तो भाग्य व धन मिळवून देईल. मानसन्मान मिळेल. विशेषत: साहित्याशी संबंध असलेल्या लोकांना फारच चांगले आहे. त्याचप्रमाणे कलावंतांनाही आठवडा चांगला आहे. आर्थिकदृष्ट्या शुभ तारखा ३ ते ७ आहेत. एकच दोष म्हणजे लग्नातील रवि–मंगळ चिडखोर बनवितील. संयम पाळणे जरूर आहे. ज्यांची नावे ष, स, ख, ग अगर श या अक्षरांनी सुरू होत असतील त्यांनाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. सर्व आठवडा प्रगतीपर जाईल.

**मीन :** शनी दुसरा. लत्तेला आलेली साडेसाती. समोर अष्टमात गुरू. तो लग्नेश व दशमेश आहे. प्रतिष्ठा व आरोग्य या दोहींनाही वाईट आहे. धनस्थानातील शनी द्रव्यनाश करील व शिवाय वाचाशुद्धी जाईल. मंगळ–राहू बारावे. सर्व महत्त्वाचे ग्रह अशुभ आहेत. प्रत्येक व्यवहारात भांडणे होतील व अपयश येईल. गृहसौख्य व सार्वजनिक काम या दोन्हीतही अपयश येईल. मंगळ–गुरू यांच्या त्रिकोणामुळे आर्थिक बाजू संभाळली जाईल. शत्रुनाश होईल. सर्व आठवडा साधारणच आहे. ज्यांची नावे द, ज्ञ, फ, झ या अक्षरांनी सुरू होत असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळ मिळेल.

□ □ □


## पुरंदऱ्यांची नौबत

बुलंद बुरूज / हूल / कोजागिरीची रात्र / पंत
फोंडा ! फोंडा ! / नावजी बलकवडे
पिऱ्या बेरड / इमान

**आठ शिवकालीन कथा**

ब. मो. पुरंदरे
किमत साडेतीन रुपये
राजहंस प्रकाशन

## लाल चीनमधील मुस्लिम विभक्तवादाची समस्या

पृष्ठ १६ वरून

त्याची सरमेसळ केली जाऊ नये." धार्मिक श्रद्धा व दैनंदिन व्यवहार यातला फरक स्पष्ट करण्यात आला. कोणतीही जमात कोणत्याही धर्मावर श्रद्धा ठेऊ शकते. परंतु तिचा आचार व व्यवहार याने समाजवादी प्रक्रियेत अडथळा आणता उपयोगी नाही हे स्पष्ट करण्यात आले.

या एकूण वैचारिक पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष काम करीत असताना साम्यवादी पक्षाला खूपच प्रतिकार झाला. परंतु जमेल तोवर सामोपचाराने व त्यानंतर हिंसाचाराने त्यांनी हा प्रतिकार मोडून काढला. यासाठी मुस्लिम वस्ती असलेल्या प्रदेशातून हॅन साम्यवादी कार्यकर्ते मोठचा प्रमाणावर पाठविले. "शंभर फुले उमलू द्या"... हा माओ त्से तुंगच्या सामोपचारी धोरणाचा भाग होता, पण डाव उलटला तेव्हा शुद्धीकरणाची मोहीम, लाल रक्षकांची मोहीम, अशा मोहिमाही त्यांना उभ्या कराव्या लागल्या.

एवढे असूनही चीनला मुस्लिम धर्मवादावर संपूर्णपणे मात करता आलेली नाही. पुढील प्रयोग कोणत्या दिशेने वळतील हे काळच ठरवील.

### भारतीय प्रयोग

हिंदु – मुस्लिम प्रश्न भारतातही ज्वलंत आहे. वारंवार होणाऱ्या दंग्यांमुळे या दोन जमाती परस्परांपासून जास्त दूर जात आहेत.

भारताने लोकशाही समाजव्यवस्था स्वीकारली आहे. लोकशाही मार्गानेच एकूण समाजपरिवर्तनाचे कार्य पुढे रेटले पाहिजे. पोलिसांच्या व लष्कराच्या बळावर जातीय ऐक्य व सलोखा साधणे योग्य नव्हे, हे खान अब्दुल गफारखान यांनी अहमदाबाद येथे मांडलेले मत सर्वमान्यच होण्यासारखे आहे. अधिकात अधिक आधुनिक शिक्षणाचा प्रसार करून हिंदु व मुस्लीम समाजातील अंधश्रद्धा कमी केली पाहिजे. दुर्दैवाने मुस्लिम धर्मांधतेला हिंदु धर्मांधतेने उत्तर दिले जात आहे. विषाने विष उतरविण्याचा हा प्रयोग प्रत्यक्षात यशस्वी होणार नाही. त्यासाठी बहुसंख्याक हिंदूंनी सेक्युलर होणे व देशाचे वातावरण सेक्युलर करणे हाच मार्ग होय. सेक्युलर होणे म्हणजे मुस्लिम समाजाचा अनुनय करणे, त्यांच्या धर्मांधतेवर पांघरून घालणे, धर्माच्या नावावर विभक्तवादाची कास धरण्याच्या प्रवृत्तीकडे डोळेझाक करणे असा अर्थ मुळीच नव्हे. मुस्लिम धर्मांधतेची व जातीयवादाची देखील निर्भीड चिकित्सा झाली पाहिजे; पण हे सर्व उदारमतवाद्यांनीच केले पाहिजे. मुस्लिम समाजात जागृतीची प्रक्रियाच निर्माण झाली नसल्यामुळे हिंदु उदारमतवाद्यांनी या

समाजात जाऊन विविध सामाजिक कार्ये केली पाहिजेत, ही गफारखान यांची सूचना विचारार्ह आहे. यातून अभिसरणाची प्रक्रिया सुरू होईल व मुस्लिम बहुजन समाजावरील पकड बरीच ढिली होऊ शकेल. मात्र कोणत्याही परिस्थितीत हिंसाचार व दडपशाही या मार्गांनी समाजपरिवर्तन होऊ शकणार नाही याची दखल घेण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

भारतातील मुस्लिमांना आवाहन करावेसे वाटते की, इमाम व उलेमा आणि स्वार्थी राजकीय नेते तुम्हाला धर्मांध करून तुमचे ऐहिक जीवन दुष्कर करू पहात आहेत. कुराणाच्या नावाखाली तुमच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन तुम्हाला आधुनिक जीवनापासून दूर ठेऊ पहात आहेत याची त्वरित जाणीव तुम्हाला झाली पाहिजे.

तथाकथित राष्ट्रीय मुस्लिमांनी आपले मुखवटे फेकून दिले पाहिजेत. आपल्या समाजाच्या भल्यासाठी त्यास राष्ट्रीय प्रवाहात खेचले पाहिजे. आधुनिकीकरणाची प्रक्रिया तीव्र करण्यासाठी जाहीर व निर्भीडपणे विविध प्रश्नांची चिकित्सा केली पाहिजे, राष्ट्रप्रेम दाखविण्यासाठी कटाक्षाने राष्ट्रीय कर्तव्यावर जोमदार भर दिला पाहिजे याची जाणीव सतत समाजाला करून दिली पाहिजे. असे करता आले नाही तर राष्ट्रीय मुसलमानांनी समाजाची व देशाची फसवणूक थांबवून सार्वजनिक जीवनातून निवृत्त झाले पाहिजे.

□ □ □

**तळेगाव-दाभाडे, तळेगाव-ढमढेरे**
**जुन्नर, नारायणगाव, ओझर**
**येथे माणूस साप्ताहिकासाठी**
**विक्रेते नेमणे आहेत.**

**नियम व अटींसाठी लिहा—**
**व्यवस्थापक माणूस**

# हेन्री फॉसेट

प्रा. पां. शं. माईणकर

ईस्ट इंडिया कंपनीचा अंमल भारतात सुरू होऊन बराच काळ लोटला होता. भारतीय लोकांना काही हक्क असू शकतात ह्याकडे पूर्ण दुर्लक्ष करण्यात येत होते. भारतात येणारे बहुतेक सर्वच लहानमोठे इंग्रज अधिकारी फक्त एकच उद्दिष्ट समोर ठेवून भारतात कार्य करीत असत, आणि ते म्हणजे इंग्लंडचा जास्तीत जास्त फायदा. भारतात असलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांप्रमाणेच ब्रिटीश पार्लमेंटचे सभासदही आपल्या देशाच्या फायद्यासाठी वाटेल ती गोष्ट करायला तयार असत.

क्वचित एखादा इंग्रज अधिकारी ह्या प्रथेला अपवाद असे. ब्रिटीश पार्लमेंटचा सदस्य हेन्री फॉसेट हा त्यापैकीच एक होता. त्याला पार्लमेंटचे सभासदत्व प्रथम १८६५ मध्ये मिळाले व तेव्हापासून १८८४ पर्यंत तो सतत सभासद होता. ह्या काळात त्याने भारताच्या हिताच्या इतक्या गोष्टी केल्या की, त्यामुळे पार्लमेंटमध्ये तो 'भारतीय सदस्य' म्हणूनच गणला जाऊ लागला. पार्लमेंटच्या आपल्या पहिल्या बैठकीतच योग्य

शैक्षणिक पात्रता असलेल्या भारतीय नागरिकांना सरकारी, ब्रिटिशां-सोबत वरच्या जागा देण्यात याव्यात हा मुद्दा त्याने अत्यंत प्रभावीपणे मांडला. १८६८ साली ह्यापुढे जाऊन आय. सी. एस्. ची परीक्षा लंडन बरोबरच भारतातील मुंबई, मद्रास व कलकत्ता ह्याही ठिकाणी घेतली जावी असा ठराव त्याने मांडला. पार्लमेंटच्या सदस्यांचे भारताविषयीचे गाढ अज्ञान पाहून त्याला वाईट वाटत असे. १८६८ मधील ॲबिसिनियन युद्धात ब्रिटिशांतर्फे वापरण्यात आलेल्या सैन्यापैकी जवळजवळ तीन चतुर्थांशपेक्षा जास्त सैन्य हे फक्त भारतातून घेण्यात आले होते, व विशेष म्हणजे त्याचा संपूर्ण खर्च भारताच्या तिजोरीवर टाकण्यात आला होता. फॉसेटने ह्या अन्यायाविरुद्ध आवाज उठविला. पण पार्लमेंटच्या इतर सदस्यांनी मदत न केल्यामुळे त्याचा ठराव २३ विरुद्ध १९८ मतांनी फेटाळला गेला. एवढे झाले तरी ह्या अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचे आपले कार्य फॉसेटने सोडले नाही. त्याच्या अविरत प्रयत्नांना यश येऊन शेवटी ब्रिटीश सरकारला नमावे लागले आणि लढाईचा खर्च इंग्लंड व भारत ह्या देशांमध्ये समसमान प्रमाणात वाटून घेण्याचे ठरले. त्याच वर्षी तुर्कस्तानच्या सुलतानाने इंग्लंडला दिलेल्या भेटीच्यावेळी लंडनमधील इंडिया ऑफीसमध्यें जो स्वागताचा राजेशाही कार्यक्रम आखण्यात आला होता, त्याच्या खर्चाचा भारही भारतावरच टाकण्यात आल्याबद्दल फॉसेटने जळजळीत शब्दात टीका केली होती.

पण ही टीका वरपांगी स्वरूपाची केव्हाच नव्हती. भारतीयांचे कमालीचे दारिद्र्य पाहून त्याला वाईट वाटत असे; आणि ह्यामुळेच तो भारतीयांच्या विपन्नावस्थेचे सत्य स्वरूप ब्रिटीश पार्लमेंटसमोर उभे करू शकत असे. फॉसेटने भारतीयाकरिता केलेल्या एवढ्या अवाढव्य परिश्रमांचे चीज थोड्याफार प्रमाणात १८७१ साली झाले, आणि भारताच्या वित्तव्यवस्थेची पहाणी करण्यासाठी जे एक उच्चाधिकार मंडळ ब्रिटीश सरकारतर्फे नेमण्यात आले त्याच्या अध्यक्षपदी त्याची योजना करण्यात आली. फॉसेटने आपले काम उत्कृष्ट रीतीने पार पाडले.

तात्कालीन गव्हर्नर जनरल लॉर्ड लिटन याच्या साम्राज्यवादी धोरणावर फॉसेट नेहमी कडक टीका करीत असे. अफगाणिस्तानची

झालेले युद्ध हे ब्रिटिशांनी मुद्दामहून ओढवून घेतलेले आहे असेही तो म्हणत असे. मँचेस्टर येथील गिरण्यांच्या मालकांनी टॅरीफमध्ये मागितलेली सूट कशी अयोग्य आहे आणि त्यामुळे भारताचे दारिद्र्य आणखीनच कसे वाढणार आहे याचे यथार्थ चित्रण त्याने पार्लमेंटमध्ये केले, आणि भारतातील प्रजा दुष्काळात तडफडून मरत असता, तिची पर्वा न करता दिल्लीमध्ये मोठा शाही दरबार भरवून त्याकरिता केलेल्या भरमसाठ खर्चावरही त्याने कठोर टीका केली.

पण ह्या बोचक टीकेमुळे फॉसेट खुद्द इंग्लंडमध्येच अप्रिय होऊ लागला होता. त्याचाच परिणाम म्हणजे १८७४ मधील निवडणुकीत आपल्या ब्रायटन ह्या मतदार संघातून तो पार्लमेंटवर निवडून येऊ शकला नाही. त्याच्या निवडणुकीतील पराजयामुळे सर्वच भारतीयांना फार वाईट वाटले. आता आपला आवाज ब्रिटीश पार्लमेंटमध्ये काढणारा कोणी राहिला नाही ही खंत त्यांच्या मनाला लागली. आपल्या केवळ नऊ वर्षांच्या कारकीर्दीतच फॉसेटने भारतीयांचे इतके अमाप प्रेम संपादन केले होते की, त्याच्या पराजयाची बातमी आल्यानंतर लगोलग भारतात त्याच्यासाठी निधी जमविण्याला सुरुवात झाली; आणि गरीब, दरिद्री, अर्धपोटी भारतीयांनी आपल्या पोटाला चिमटा काढून पै पै करून साडेसातशे पौंड उभे केले, आणि ती रक्कम फॉसेटला दुसऱ्या मतदार संघातून पोटनिवडणूक लढविण्यासाठी पाठवून दिली. भारतीयांच्या ह्या अपार प्रेमाच्या वर्षावाने फॉसेटला गहीवर आला. त्याने पुन्हा कंबर कसली आणि ' हॅकेंबी ' मतदार संघातील पोटनिवडणुकीला उभा राहून तो प्रचंड बहुमताने निवडूनही आला.



गोरेगाव येथील उत्क्रांती दलासमोर आबांनी ठेवला होता. इतरांनाही त्या कार्यक्रमात सहभागी होण्याचे या लेखात आवाहन केलेले होते. या लेखाच्या अनुरोधाने दिंडोशीला जाऊन मी त्यांच्याशी चर्चा केली, माझा सुप्याचा अनुभव सांगितला, भायल्या मंगलच्या शेतात जाऊन आबांनी योजलेली विहिरीचा जागा नजरेखालून घातली —

पाण्याची निश्चित जागा ठरविण्याची खात्रीलायक सोय आपल्याकडे नाही. अपेक्षित पाणी लागले नाही तर खर्च — मेहनत सारे वाया जाते. सुप्याला सुरुवातीला असेच घडले. पंचवीस — तीस फूट खणल्यावर जेवढे पाणी लागेल असे वाटले होते, पाणी पाहणाऱ्याने सांगितले होते, त्यापेक्षा ते कमी लागले. सर्वांनीं हातपाय गाळले. पहिला पावसाळा उलटला. विहीरीचा खड्डा पावसाच्या पाण्याने खूप भरला. दिवाळीच्या आसपास पिकासाठी एक पाऊस लागत होता. तो पडला नाही. हातीतोंडी आलेले पीक सुकून चालले. यापूर्वी अनेक वर्षे ते असेच वाळून जात असे, पण यंदा नवीन खणलेल्या विहिरीतील साठलेल्या पाण्याचा आधार होता. मंडळींनी इंजिने लावून पाणी खेचले व एरव्ही वाळून गेले असते ते पीक वाचवले. गेली दोन वर्षे या साठवणीच्या पाण्याचा अशा मोक्याच्या वेळी उपयोग होत आहे. शंभर टक्के नाही तरी पन्नास—साठ टक्के श्रम आणि पैसा त्यामुळे सार्थकी लागलेला आहे.

शंभर टक्के यशासाठी हा विहीर-कम-खड्डा प्रयोग हमखास पावसाळी भागात हाती घेतला जावा ही आबांची सूचना होती. पाणी लागले तर बांधकामाचा खर्च करून विहीर पूर्ण करायची. नाही लागले तर साठवणीचा खड्डा म्हणून उपयोग आहेच. ठाणे—कुलाबा—रत्नागिरी हे आपल्याकडील हमखास पावसाचे जिल्हे. या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसमोर मोठ्या प्रमाणावर हा कार्यक्रम ठेवण्यासारखा आहे. श्रमाचे तंत्र लवकर आत्मसात होऊ शकणारे. उत्पादनवाढीला निश्चित हातभार. खर्चही बेताचा. आबांच्या घरी आदल्या रात्री हाच विषय चर्चेला होता. प्रा. गोपाळ राणे व उत्क्रांती दलाचे काही कार्यकर्ते हजर होतेच. भायल्या मंगलच्या शेतातील विहीर या दृष्टीने नाताळच्या सुट्टीत पुरी करण्याचे ठरले.

आणि मी चर्चेचे निष्कर्ष अधिक बारकाईने तपासून पाहण्यासाठी तसाच पुढे ठाणे जिल्ह्यातील डहाणू—तलासरी भागात — गोदाराणीच्या लाल महालात शिरलो.

तेथे पाहतो तो लाल बावट्याचे प्रचारयंत्र नेमक्या उलट दिशेने फिरताना दिसले.

(क्रमशः)

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd No. M H-649

| | | |
|---|---|---|
| लाल महाल | प्रतापगड | पन्हाळगड |
| राजगड | पुरंदर | आग्रा |

आवृत्ती : तिसरी
किंमत : तीन रुपये

ब. मो. पुरंदरे

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव
पुणे ३०